सोमवार, ८ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक २२
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## टीईटी परीक्षेतील बोगस शिक्षकांची यादी प्रसिद्ध

**नाशिक** : बेकायदेशीरपणे केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या टीईटी परीक्षा घोटाळ्यातील सुमारे आठ हजार शिक्षकांना पुणे येथील राज्य परीक्षा परिषदेने लगाम लावला आहे. आगामी काळात टीईटी परीक्षा घोटाळ्यातील दोषींना कधीच परीक्षा देता येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला असून संबंधित बोगस शिक्षकांची यादी परीक्षा परिषदेने प्रसिद्ध केली आहे. टीईटी परीक्षा घोटाळा प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खळबळ उडाली होती. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेत गैरप्रकार केलेल्या उमेदवारांची यादी परीक्षा परिषदेने पोर्टलवर जाहीर केली असून सात हजार ८७४ उमेदवारांची टीईटीची प्रमाणपत्रे रद्द करण्यासह त्यांना आगामी काळात टीईटी परीक्षा देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध घालण्यात आला आहे.

अंतरंग
नवीन पनवेलच्या भुयारी मार्गातील पाण्यामुळे अपघात/३
जिल्हा शासकीय रुग्णालय मोजतेय अखेरची घटका/५
उलवे नोड येथे आमदार चषक फुटबॉल स्पर्धा/८

# आठवडाभरात मंत्रिमंडळ विस्तार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ओबीसी महासंघाच्या सभेत माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने मंत्रिमंडळाचा विस्तार करू नका, असे कुठेही म्हटलेले नाही. न्यायालयातील सुनावणीचा आणि मंत्रिमंडळ विस्ताराचा कोणाताही संबध नाही. आठवडाभरात मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या बैठकीत सांगितले. त्याचप्रमाणे शिंदे गटाचे खासदार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगत, केवळ भावनिक भाषण देऊन जनता सोबत येत नसते, असा टोला त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना लगावला.





> गेल्या सरकारमध्ये अनेक सचिवांना अधिकार होते. त्याआधीही आमच्या सरकारमध्ये अनेक मंत्र्यांनी सचिवांना हे अधिकार दिले होते. महाराष्ट्रातच नव्हे तर देशातही ही परंपरा आहे. हे सरकार जनतेचे असून, जनतेचे मुख्यमंत्री आहेत. जनताच महाराष्ट्रात निर्णय घेईल.
> –देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

नवी दिल्ली येथे रविवारी (दि. ७) राष्ट्रीय ओबीसी महासंघाची सभा पार पडली. त्या सभेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, ओबीसी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आमचे सरकार करेल, तसेच ओबीसींच्या हिताचे निर्णय आम्ही घेऊ, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दरम्यान, ओबीसींच्या हितासाठी राजकीय आरक्षण मिळवून देण्यासाठी आमच्या सरकारने प्रयत्न केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमच्या सरकारच्या काळात २०१४पासून २०१९पर्यंत आम्ही ओबीसींच्या हिताचे २२ निर्णय घेतले असे उपमुख्यमंत्री बोलताना म्हणाले आहेत, तर सध्या राज्यात असलेले सरकार ओबीसींच्या हिताचे निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मी नागपूरमध्ये बोललो होतो की, आमचे सरकार आले, तर आम्ही ओबीसी आरक्षण मिळवून देऊ. नाही तर मी राजकारणातून संन्यास घेईन, पण आता आमच्या सरकारने ते आश्वासन पूर्ण केले आहे, असेही फडणवीस या वेळी म्हणाले आहेत.

सध्या राज्यात असलेले शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार हे ओबीसींच्या हिताचे सरकार आहे. केंद्राच्या मंत्रिमंडळात आज ४० टक्के मंत्री हे ओबीसी समाजाचे आहेत, ही एक महत्त्वाची बाब आहे. त्याचबरोबर शिक्षणातसुद्धा ओबीसींना न्याय देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले आहे. मी मागच्या ३० वर्षांत राजकारणात आहे, पण मी ज्या ठिकाणाहून निवडून येतो तिथे सर्व लोक ओबीसी समाजाचे आहेत. त्यामुळे ओबीसींच्या हिताचे निर्णय घेणे माझे कर्तव्य आणि जबाबदारी आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# २०४७ पर्यंत स्वयंपूर्णतेचे लक्ष्य

## नीती आयोगाच्या बैठकीत पंतप्रधान मोदींचा निर्धार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि. ७) नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या दरम्यान पंतप्रधान मोदींनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन कृषी विविधीकरणाचे महत्त्व व्यक्त केले. विशेषत: खाद्यतेलामध्ये स्वयंपूर्ण होण्याची गरज असल्याचे सांगितले.

या बैठकीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शहरी प्रशासन, कोविडनंतरची परिस्थिती आणि २०४७चे लक्ष्य या विषयांवरही चर्चा झाली. याशिवाय डाळींचे उत्पादन आणि पुढील वर्षी भारतात होणाऱ्या जी–२० बैठकीबाबतही या बैठकीत चर्चा झाली. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, कोविड संकटकाळात भारताची संघराज्य रचना आणि सहकारी संघराज्य संपूर्ण जगासाठी एक मॉडेल म्हणून उदयास आली आहे.

केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, राजनाथ सिंह, एस जयशंकर तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित होते.

### केंद्राचे आम्हाला सहकार्य–मुख्यमंत्री

*नीती आयोगाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत, या बैठकीत महाराष्ट्राच्या कृषी विभागात बदल घडविणे, जलशिवार योजना, शाळांमध्ये 'आमचे गुरुजी' योजना राबविणे, राष्ट्रीय शिक्षण योजनेची राज्यात अंमलबजावणी, ग्रामीण भागातील शिक्षण पद्धती सुधारणे, स्मार्ट सिटी निर्माण करणे, एक खिडकी सेवा ४०० नगरपालिकांमध्ये ऑनलाईन करण्याला १५ ऑगस्टला सुरुवात होणार आहे. राज्यात असणारे शिवसेना–भाजप युतीचे सरकार हे केंद्र सरकारच्या सहकार्याने चांगले काम करीत आहे, असे सांगितले.*

# स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून स्वदेशी सलामी; अटॅग्स तोफेची निर्मिती

**पुणे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त यंदा लाल किल्ल्यावरून स्वदेशी बनावटीच्या अटॅग्स तोफेची सलामी दिली जाणार आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (डीआरडीओ) शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास आस्थापना (एआरडीई) या प्रयोगशाळेद्वारे अटॅग्स तोफेची निर्मिती करण्यात आली आहे.

यंदा लाल किल्ल्यावर २१ तोफांची सलामी देण्यासाठी ब्रिटिश २५ पौंडी तोफांसोबत डीआरडीओने तयार केलेल्या स्वदेशी दोन अटॅग्स तोफांचा वापर केला जाणार आहे. नुकत्याच झालेल्या चाचण्यांमध्ये अटॅग्सने आपली क्षमता सिद्ध केली असून सध्या गुणवत्ता आश्वासन महासंचालनालयाद्वारे (डीजीक्यूए) तोफेची मुल्यांकन प्रक्रिया सुरू आहे.

सैन्यदलातील जुन्या तोफांना आधुनिक १५५ एमएम तोफांनी बदलण्यासाठी डीआरडीओतर्फे अटॅग्स निर्मिती प्रकल्पाची सुरुवात २०१३मध्ये करण्यात आली. या तोफा निर्मितीसाठी एआरडीई प्रयोगशाळेने भारत फोर्ज लिमिटेड आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स लिमिटेड या दोन खासगी कंपन्यांशी करार केला. अटॅग्स ही तोफ ४८ किमी. लांब पल्ल्याचे लक्ष्य भेदण्यास सक्षम आहे.

जगातील इतर अशाच प्रकारच्या तोफांच्या तुलनेत अटॅग्सची अचूकपणे मारा करण्याची क्षमता सर्वाधिक असून विविध हवामानाच्या परिस्थितीत अटॅग्सच्या क्षमतेची चाचण्या पार पडल्या आहेत.



उलवे नोड : रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि पनवेल फुटबॉल क्लबच्या संयुक्त विद्यमाने आमदार चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

(सविस्तर वृत्त पान ८ वर...)

## निवडक

### दिल्लीत दहशतवाद्याला अटक

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) इसिसचा सक्रिय सदस्य मोहसीन अहमद या दहशतवाद्याला दिल्लीतून अटक केली आहे. एनआयएने रविवारी (दि. ७) मोहम्मद शकील अहमद याच्या निवासस्थानाची झडती घेतली. यादरम्यान घरातून अनेक गुन्ह्यांची कागदपत्रे सापडली आहे. मोहसीन हा इसिस या दहशतवादी संघटनेत सक्रिय असल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

### क्युबात ऑईल डेपोला आग

**हवाना** : क्युबात ऑईल डेपोवरच वीज कोसळल्याने लागलेल्या आगीत ८० जण जखमी झाले, तर १७ अग्निशमन दलाचे कर्मचारी बेपत्ता आहेत. ही घटना शनिवारी (दि. ६) क्युबातील मतांझास शहरात घडली. मिळालेल्या माहितीनुसार, वादळीवाऱ्यानंतर मतांझास शहरात इंधन साठा असणाऱ्या मतांझास सुपरटँकर बेसवर वीज पडली. त्यामुळे एका इंधन टँकरला आग लागली.
ही आग पसरून आणखी एका इंधन टँकरला आग लागली आणि आजूबाजूचा परिसरही भक्ष्यस्थानी आला.

# गणेशोत्सवात यंदाही कोकण रेल्वेमार्गावर धावणार मोदी एक्स्प्रेस

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सव जवळ आल्याने मुंबईत राहणाऱ्या कोकणवासियांना गावाकडचे वेध लागले आहेत. गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे एक्स्प्रेसचे तिकीट मिळणे अनेकांसाठी अवघड होते. तिकीट मिळत नसल्याने अनेक जण अतिरिक्त पैसे मोजून बसने जाणे पसंत करतात.



यामुळेच गणेशोत्सवात चाकरमान्यांसाठी यावर्षीही मोदी एक्स्प्रेस धावणार आहे. भाजप आमदार नितेश राणे यांनी ही माहिती दिली आहे.

नितेश राणे यांनी ट्विटरला एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदाही गणपतीला गावी जाण्यासाठी मोदी एक्स्प्रेस आणण्यात येणार आहे. २९ ऑगस्टला सकाळी १० वाजता दादर रेल्वेस्थानकावरून प्लॅटफॉर्म क्र. ८वरून मोदी एक्स्प्रेस सुटणार आहे. ही एक्स्प्रेस दादरपासून कणकवलीपर्यंत जाणार असून वैभववाडीमध्ये थांबणार आहे. एक्स्प्रेसमध्ये एक वेळेचे जेवण दिले जाणार आहे, अशी माहिती नितेश राणे यांनी दिली आहे. तिकीटासाठी भाजपच्या मंडळ किंवा तालुका अध्यक्षांना फोन करायचा आहे, असे नितेश राणेंनी सांगितले आहे. कणकवली, देवगड आणि वैभववाडी येथील मंडळ आणि तालुकाध्यक्षांना संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

### या दिवशी सुटणार ट्रेन...

२९ ऑगस्टला सकाळी १० वाजता दादर रेल्वे स्थानकावरून प्लॅटफॉर्म क्रमांक ८वरून मोदी एक्स्प्रेस सुटणार आहे. ही एक्स्प्रेस दादरपासून कणकवलीपर्यंत जाणार असून, वैभववाडीमध्ये थांबणार आहे. मोदी एक्स्प्रेसमध्ये एक वेळेचे जेवण दिले जाणार आहे.

# कोकण किनारपट्टीवर पुन्हा मुसळधार

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या दहा ते १२ दिवसांपासून उघडीप दिलेल्या पावसाने आता पुन्हा जोर धरला आहे. सध्या मॉन्सूनचा कमी दाबाचा पट्टा दक्षिणेकडे सरकला असून तो राजस्थान ते पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारला आहे. पुढील पाच दिवस राज्यात मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. कोकणात या पावसाचा प्रभाव अधिक राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

दक्षिण कोकण आणि गोवा किनारपट्टीवर तसेच घाटपरिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. मागील दोन दिवसांपासून पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात पावसाची संततधार सुरू आहे.

# राज्यातील सत्तासंघर्ष प्रकरणाची आता १२ ऑगस्टला सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेतील सत्ता संघर्ष व फूट प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सोमवारी (दि. ८) अपेक्षित असलेली सुनावणी लांबणीवर गेली असून आता ती १२ ऑगस्ट रोजी होणार आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारची वैधता, विधानसभा अध्यक्षांची निवड व अन्य मुद्यांवर शिवसेना नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. शिंदे गटातील आमदारांना अपात्र ठरविण्याची त्यांची मागणी असून शिंदे यांनी विधानसभा उपाध्यक्षांची नोटीस रद्द करण्याची विनंती केली आहे.

सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी व न्यायमूर्ती हिमा कोहली या त्रिसदस्यीय पीठापुढे या प्रकरणी प्राथमिक सुनावणी पूर्ण झाली आहे. या याचिका पाच किंवा अधिक सदस्यांच्या घटनापीठाकडे पाठवायच्या की नाही, यांसह काही मुद्यांवर सोमवारी (दि. ८) निर्णय दिला जाईल, असे न्यायालयाने गेल्या सुनावणीच्या वेळी सूचित केले होते, पण न्यायालयाच्या पुढील आठवड्यासाठी निश्चित झालेल्या कार्यसूचीत या याचिकांवरील सुनावणी १२ ऑगस्ट रोजी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आता सोमवारी सुनावणी होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पनवेलमध्ये आमदार चषक भव्य तायक्कांडो स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील जाणीव एक सामाजिक संस्था व रायगड तायक्कांडो असोसिएशनच्या वतीने तायक्कांडो आमदार चषक २०२२ स्पर्धा भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन रविवारी (दि. ७) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील व रायगड तायक्कांडो असोसिएशन यांच्यातर्फे ही एक दिवसीय स्पर्धा शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत ५००हून अधिक स्पर्धक सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या उद्घाटनाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, समीर ठाकूर, अजय बहिरा, प्रदीप सावंत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, रुचिता लोंढे, निता माळी, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, रायगड जिल्हा तायक्कांडोचे असोसिएशनचे अध्यक्ष सदानंद निंबरे, सरचिटणीस सुभाष पाटील, खजिनदार प्रभाकर भोईर, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, प्राचार्य आनंद, महिला मोर्चाच्या माजी जिल्हाध्यक्षा कल्पना राऊत, सांस्कृतिक सेल अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, अरुण सोळंकी, आदिती मराठे, लीना पाटील, स्नेहल खरे, चंद्रकांत पाटील, उमेश इनामदार, प्रसाद हनुमंते, प्रसाद म्हात्रे, मनोज पाटील, रुपेश नागवेकर, प्रवीण काणे, महेश सरदेसाई, शैलेश कदम, राहुल सावंत, प्रसाद कंदारे आदी उपस्थित होते.



### आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान

या वेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक पटक विजेत्या प्राजक्ता अंकोलेकर, राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक विजेते शुभम पोवार, जपानमधील स्पर्धेत सुवर्णपदक विजेते पुनीत पाटील, कोरियातील स्पर्धेत सुवर्णपदक विजेते ओंकार भगत यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले.

# ईडीकडून वर्षा राऊत यांची आठ तास चौकशी

**मुंबई : प्रतिनिधी**

सक्तवसुली संचालनालयाने गोरेगावमधील पत्राचाळ घोटाळा प्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांना अटक केल्यानंतर आता या प्रकरणी त्यांच्या पत्नी वर्षा राऊत यांचीही चौकशी केली. शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या पत्नी वर्षा राऊतांची ईडीने शनिवारी (दि. ६) आठ तासांहून अधिक काळ कसून चौकशी करून त्यांचा सविस्तर जबाब नोंदवला आहे.



पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणातील एक कोटी आठ लाख रुपये संजय राऊत व त्यांच्या पत्नी वर्षा राऊत यांच्यापर्यंत पोहचल्याचा आरोप असून याप्रकरणी चौकशीसाठी त्यांना ईडीने समन्स बजावले होते.

वर्षा राऊत यांच्याकडे आलेल्या काही रकमेबाबत शनिवारी ईडीकडून त्यांची चौकशी करण्यात आली. या वेळी संजय राऊत यांनी दिलेल्या उत्तरांचीही पडताळणी करण्यात आली.

ईडीच्या चौकशीनंतर रात्री उशिरा माध्यमांशी बोलताना वर्षा राऊत यांनी, मला पुन्हा ईडी चौकशीसाठी बोलावण्यात आलेले नाही, मात्र ईडीने पुन्हा चौकशीला बोलावले तरी मी चौकशीसाठी पुन्हा हजर राहिन, असे सांगितले.

# मुंबईत गणेशोत्सवासाठी १४०० अर्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

दोन वर्षांनंतर यंदाचा गणेशोत्सव निर्बंधमुक्त साजरा होणार असून महापालिकेकडे परवानगीसाठी एक हजार ४००हून अधिक मंडळांचे अर्ज आले आहेत. त्यापैकी ७५० मंडळांना परवानगी देण्यात आली आहे.

कोरोनामुळे गेली दोन वर्षे गणेशोत्सवावर अनेक निर्बंध होते, मात्र यंदा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्याची प्रक्रिया पालिका प्रशासनाने सुरू केली असून यासाठी ४ जुलैपासून एक खिडकी योजना सुरू केली आहे. गेल्या महिन्याभरात पालिकेकडे एक हजार ७०६ अर्ज आले आहे. त्यापैकी ७५३ अर्ज मंजूर करण्यात आले.

## निवडक



### उरण येथे श्री गुरुचरित्र पारायण सुरू

**उरण :** शहरातील आनंदनगर येथे आध्यत्मिक विकास व बालसंस्कार समाज मंदिर यांच्या वतीने श्री गुरु चरित्र पारायण गुरुवार (दि. ४) ते बुधवार (दि. १०)पर्यंत सकाळी ८.३० ते १०.३० वाजेपर्यंत या आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ वाजता स्वामींचा अभिषेक व त्यानंतर १०.३० वाजता महाआरती करण्यात येते. श्री गुरु चरित्र पारायणला महिला व पुरुष असे ७० सेवेकरी बसले होते. दर गुरुवारी १०.३० वाजता महाआरती, तर सायंकाळी ६.३० वाजता महाआरती केली जाते. उरण शहरातील अनेक सेवेकरी, नागरिक, महिलावर्ग दर्शनाचा लाभ घेत असतात. आरती झाल्यानंतर प्रसाद वाटप केला जातो.

### पनवेलमधून दुचाकीची चोरी

**पनवेल :** शहरातून एका अॅक्टीव्हा गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. संतोष घोडींदे यांची १५, ००० रुपये किमतीची होंडा कंपनीची अॅक्टिव्हा (एमएच ०६ एएम ६७६६) ही लाईन आळी येथील लक्ष्मी अपार्टमेंट येथून एका २५ ते ३० वर्ष वयोगटातील व्यक्तीने चोरून नेल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्या व्यक्तीचे वर्णन असे की, डोक्यात काळी-पांढरी टोपी आहे, अंगात काळा टीशर्ट त्यावर निळे व ऑरेंज पट्टे तसेच निळी जीन्स पॅन्ट व पायात चप्पल आहे.

### कामोठे वसाहतीमध्ये चोरी

**पनवेल :** एका कार्यालयातील ड्रॉवरमध्ये ठेवलेल्या ७० हजारांच्या रोख रक्कमेची चोरी झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. येथील सेक्टर १४ याठिकाणी असलेल्या एका वॉटर सप्लायरच्या कार्यालयात टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले ७० हजार रुपये चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कळंबोलीत सायलेन्सरची चोरी

**पनवेल :** एका इको गाडीच्या सायलेन्सरची चोरी झाल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. नाना यादव यांनी त्यांची मारुती सुझुकी इको कार ही बिमा कॉम्प्लेक्स याठिकाणी उभी करून ठेवली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने यादव यांच्या गाडीचा सायलेन्सर काढून नेला. ही बाब त्यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात केली आहे.

# विकासासाठी कटिबद्ध

## श्रीवर्धन येथे बैठकीत आमदार गोगावले यांचे मार्गदर्शन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनच्या विविध विकास कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नवीन सरकारकडून तालुक्याला झुकते माप मिळणार असल्याची ग्वाही आमदार भरत गोगावले यांनी श्रीवर्धन येथे बैठकीत बोलताना दिली.

श्रीवर्धनमधील शासकीय विश्रामगृह श्रीवर्धन येथे रविवारी (दि. ७) शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले व जिल्हाप्रमुख नवीन कार्यकारिणी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उप जिल्हाप्रमुख श्यामकांत भोकरे, तालुका प्रमुख प्रतोष कोळथरकर, दादा मांडवकर, पिंट्या वेश्वीकर, पाटेकर, आदेश पाटील, प्रशांत शिंदे, हरिओम चोगले, किशोर भोइणकर, रत्नाकर लांबाडे, लखन भाटकर, आशुतोष पाटील आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





या वेळी आ. भरत गोगावले म्हणाले की, आज जी राज्यात परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत अनेक वेळा मातोश्रीवर कल्पना दिली होती. जे काही घडले त्याचा आपण साक्षीदार आहे. राज्यात भाजप शिवसेनेचे सरकार स्थापन व्हावे ही सर्व निवडून गेलेल्या आमदारांची तसेच खेड्यापाड्यातील मतदारांची सुध्दा मनापासून इच्छा होती. याबाबत आम्ही सर्व आमदार एकत्र येवून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना अनेक वेळा सांगत होतो. परंतु आमचे न ऐकता राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. मात्र हे जनतेला मान्य नव्हते. त्याचप्रमाणे सत्ता स्थापन झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी मोठ्या प्रमाणात त्यांच्याच मतदार संघातील विकास कामांसाठी निधी घेतला आणि आम्हाला कमी देत राहिले. गोडगोड बोलुन आमच्या पक्षातील लोकांना सुध्दा सामिल करून मागुन आमच्याच विरोधात काम करू लागले. मात्र हे उद्धव ठाकरे यांच्या लक्षात येत नव्हते. अशा प्रकारे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. शेवटी आम्ही ५५ पैकी ४० आमदार व अपक्ष १० आमदार यांनी एकत्र येवुन जनतेच्या हितासाठी निर्णय घेतला आहे.

आम्ही आजही शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांचे शिवसैनिक आहोत. त्यांचेच विचार घेऊन आम्ही पुढे जात आहोत. आम्ही जनतेच्या विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. यापुढेही जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले जाईल. आज तुम्हाला ग्वाही देतो की, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव व तळा या तालुक्यासाठी शिवसेनेचे व भाजपचे आमदार एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात विकास कामे करणार आहोत. अन्य तालुक्यांचाही याप्रमाणेच विकास करणार आहोत असेही ते म्हणाले.

आमदार गोगावले पुढे म्हणाले, विकास कामे करण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे श्रीवर्धन मतदारसंघात अधिक लक्ष दिले जाणार आहे. आज आपण खऱ्या अर्थाने सुटकेचा निश्वास टाकला आहे. आम्ही मागच्या कालावधीमध्ये पालकमंत्रीपद हटाव ही मोठ्या प्रमाणात भूमिका घेतली होती. परंतु वरिष्ठांचा साधा याबाबत फोनसुध्दा आला नाही. निधीसाठी आम्ही प्रयत्न करायचा आणि श्रेय मात्र त्यांनी घ्यायचे ही भूमिका ते करत होते. परंतु आता तसे घडणार नाही. आता मनासारखे सरकार स्थापन झाले आहे. ते पुढे असेही म्हणाले की, सर्वोच्च न्यायालय हे आमच्याच बाजुने निर्णय देईल. न्यायदेवतेवर आमचा विश्वास असेही आमदार गोगावले म्हणाले.



# घरोघरी तिरंगा अभियानात सहभागी व्हा

## उरण नगर परिषदेतर्फे नागरिकांना आवाहन

**उरण : वार्ताहर**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या अनुषंगाने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत उरण नगर परिषदेतर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकाच्या घरावर तसेच सर्व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक शासकीय, निमशासकीय, खासगी सूचनेनुसार घरोघरी तिरंगा कार्यक्रम आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करणे अपेक्षित असल्याचे नगर परिषदेतर्फे सांगण्यात येत आहे.

या वेळी प्रत्येक नागरिकांनी संहितेचे पालन करावे. तिरंगा फडकविताना केशरी रंग वरच्या बाजूने असावा, तिरंगा झेंडा उत्तरवताना काळजीपूर्वक सन्मानाने उतरावा.

उरण नगर परिषदेने झेंडा वितरण केंद्रांची स्थापना केली असून घरोघरी तिरंगा या अभियानाकरिता उरण नगर परिषदेने ५ ऑगस्टपासून उरण नगर परिषद कार्यालय, पेन्शनर्स पार्क गणपती चीक, मोरा साईबाबा मंदिर या ठिकाणी झेंडा वितरण विक्री केंद्रे स्थापन केले असून याठिकाणी सर्व नागरिकांनी ३० रक्कम रुपये मात्र भरून झेंडा खरेदी करावा, असे आवाहन उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी केले आहे.

### झेंडा सन्मानाने जतन करावा

***घरोघरी तिरंगा उपक्रमात १३ ते १५ ऑगस्ट हे तीन दिवस तिरंगा फडकविताना दररोज संध्याकाळी झेंडा खाली उतरवण्याची आवश्यकता नाही. घरोघरी तिरंगा झेंडा उपक्रमांतर्गत लावण्यात आलेले झेंडे अभियान कालावधीनंतर प्रत्येकाने सन्मानाने व सुरक्षित ठेवावे, अभियान कालावधीनंतर झेंडा फेकला जाऊ नये, तो सन्मानाने जतन करून ठेवावा. अर्धा झुकलेला, फाटलेला, कापलेला हा कुठल्याही परिस्थितीत लावला जाऊ नये, अशा सूचना नगर परिषदेतर्फे करण्यात आल्या आहेत.***

## बृहन महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन ११ ऑगस्टपासून न्यू जर्सीत

**मुंबई : प्रतिनिधी**

जगभरातील मराठी बांधव ज्या अधिवेशनाची आतुरतेने वाट पाहतात ते मराठी मनाला जोडणारे बृहन महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन तीन वर्षांच्या विश्रांतीनंतर अटलांटिक शहर न्यू जर्सी येथे ११ ते १४ ऑगस्टदरम्यान आयोजित केले जाणार आहे, अशी माहिती मंडळाच्या अध्यक्ष डॉ. विद्या जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दर दोन वर्षांनी होणारे हे अधिवेशन कोरोनामुळे गेल्या वर्षी होऊ शकले नव्हते, मात्र आता मोठ्या जोशात आणि जल्लोषात साजरे करण्यासाठी बृहन महाराष्ट्र मंडळ सज्ज झाले आहे. या चार दिवसीय अधिवेशनात मराठी मनाला साद घालणारे एकापेक्षा एक असे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

या अधिवेशनाचा संस्मरणीय समारोप शंकर महादेवन यांच्या सांगीतिक कार्यक्रमाने केला जाणार असल्याची माहितीही जोशी यांनी दिली. या दिग्गज कलाकारांच्या मांदियाळीत उत्तर अमेरिकेच्या २५ शहरातील स्थानिक कलाकारांची धमाल सादरीकरणेही होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## जासईमध्ये पोलिसांकडून विद्यार्थ्यांचे प्रबोधन



**उरण : वार्ताहर**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने उरण पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुहास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाणे हद्दीतील जासई येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व दि. बा. पाटील जुनियर कॉलेजमध्ये सायबर गुन्हे, लैंगिक अत्याचाराबाबत व अमली पदार्थामुळे होणारे दुष्परिणाम, याबाबतचे प्रबोधन करून जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास १६० विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी उरण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गुन्हे सुहास चव्हाण, सहाय्यक निरीक्षक विशाल राजवाडे, फौजदार घोडके, उपनिरीक्षक अंजना गायकवाड, उपनिरीक्षक गुरव, हवालदार अविनाश पाटील, नाईक भीमराज शिंदे, नाईक युवराज जाधव, शिक्षकवर्ग, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## दिलेली जबाबदारी आम्ही पार पाडू -सामंत

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री जो विस्तार करतील, ज्यांच्यावर जी जबाबदारी देतील ती आम्ही पार पाडू, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांनी व्यक्त केला. तसेच मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होईल, असेही ते म्हटले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नीती आयोग आणि हर घर तिरंगा मोहिमेच्या मिटिंगसाठी दिल्लीत आहेत. तेथूनच त्यांनी मंत्रिमंडळ विस्ताराची भूमिका स्पष्ट केली आहे. विरोधक आम्हाला हिणवत आहेत, परंतु सुप्रीम कोर्टात चालू असलेल्या केसचा आणि मंत्रिमंडळ विस्ताराचा काहीही संबंध नाही. येत्या काही कालावधीतच मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असे उदय सामंत यांनी रत्नागिरीत आपल्या पाली येथील निवासस्थानी बोलताना सांगितले.

ज्यावेळी मंत्री मंडळाचा विस्तार होत असतो, त्यावेळी प्रत्येकाला आपण मंत्री व्हावे असे वाटत असते. पण, आम्ही शिंदे यांच्यावर विश्वास ठेवलेला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री जो विस्तार करतील, ज्यांच्यावर जी जबाबदारी देतील ती आम्ही पार पाडू असेही त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री शिंदे समर्थक गटाच्या जिल्हा प्रमुखपदी राजा केणी

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील आक्रमक, सेवाभावी नेतृत्व अशी ओळख असलेले आणि आमदार महेंद्र दळवी यांचे खंदे समर्थक राजा केणी यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक गटाच्या उत्तर रायगड जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर दक्षिण रायगड जिल्हाप्रमुखपदी प्रमोद घोसाळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईत नुकत्याच झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या नियुक्तीबद्दल राजा केणी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आमदार महेंद्र दळवी यांनीही केणी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## पनवेलमध्ये पोलिसांसाठी आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली परिमंडळ २ हद्दीतील सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह कुटुंबीयांसाठी रविवारी (दि.७) महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी परिमंडळ २ मधील सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात डॉ. गिरीश गुणे आणि त्यांची २० डॉक्टरांची टीम कार्यरत होती. नवी मुंबई पोलिस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ २, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल, शंकरा आय हॉस्पिटल आणि डी वाय पाटील हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या सर्वांच्या प्रयत्नातून गेली ९ वर्षे हा उपक्रम आयोजित केला जात आहे.

या वेळी सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे व धनाजी क्षीरसागर, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने, कळंबोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, कामोठ्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव, खांदेश्वरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे, खारघरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्यासह परिमंडळ २ मधील सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी व डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. हितेन शहा, डॉ. लक्ष्मण आवटे, प्रेसिडेंट लक्ष्मण पाटील, सेक्रेटरी अनिल ठकेकर यांच्यासह सर्व रोटेरिअन्स, अँस आणि ऍनेट व रोटरॅक्टर्स रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आदी उपस्थित होते.

## दुखवटा

### चंद्रकांत मोरे




**कर्जत :** नेरळ ग्रामपंचायत माजी अधीक्षक चंद्रकांत महादेव मोरे यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने वयाच्या ६८व्या वर्षी निधन झाले यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि भाऊ असा परिवार आहे. मोरे यांनी नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार अनेक वर्षे अधीक्षक म्हणून पाहिला आहे. दरम्यान, निवृत्तीनंतर त्यांनी क्षत्रिय मराठा समाजाचे काम हाती घेतले होते.

### राम म्हात्रे



**मोहोपाडा :** नवीन पोसरी येथील कै. हभप राम माया म्हात्रे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६३ वर्षे होते. यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना,जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.१४) श्रीक्षेत्र उध्दर रामेश्वर येथे होणार आहे, तर उत्तरकार्य बुधवारी (दि. १७) नवीन पोसरी येथील घरी होणार आहेत.

### दिनेश पोरे



**अलिबाग :** दिनेश दत्तात्रेय पोरे (वय ५६) यांचे मंगळवारी (दि. २) रात्री उशिरा अल्पशा आजाराने निधन झाले. रत्नागिरी टाइम्सच्या रायगड आवृत्तीचे अलिबाग कार्यालयीन प्रमुख महेश पोरे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. दिनेश पोरे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा मुलगी, दोन भाऊ, जावई, नात असा परिवार असून त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. ११) उरण येथे करण्यात येणार आहे. तर उत्तरकार्य रविवारी (दि. १४) आंबिलवाडी येथील निवासस्थानी होणार असल्याचे त्यांच्या आप्तस्वकीयांनी सांगितले.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. ८ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.





## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

# पनवेलमध्ये विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये विविध उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्याअंतर्गत पनवेल महापालिकेच्या तत्कालीन नगरसेविका व माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या नगरसेवक निधीमधून सेक्टर १६ येथील उद्यानामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांचा तसेच हायमास्ट, रस्त्याचे करण्यात आलेल्या काँक्रिटीकरचे लोकार्पण व भुमीपूजन तसेच ई कार्डचे वाटप आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले.

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवले महापालिकेच्या माध्यमातून नवीन पनवेल सेक्टर १६ येथील उद्यानात करण्यात येणाऱ्या स्टेजच्या बांधकाम करण्यात येणार आहे, तसेच माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या नगरसेवक निधीमधून सेक्टर १६ येथील उद्यानामध्ये ओपन जिम बांधण्यात आली आहे. या जिमचे तसेच विर्सजन घाटाजवळ उभारण्यात आलेल्या हायमास्टचे आणि आदिवासी वाडी परीसर ते एकविरा माता मंदिरापर्यंतच्या काँक्रिटीकरण रस्त्याचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले तसेच या वेळी ई कार्डचे वाटपही नागरिकांना करण्यात आले.

या विकासकामांच्या शुभारंभावेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड'च्या माजी सभापती अॅड. वृषाली वाघमारे, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, भाजप महिलामोर्चाच्या तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, पनवेल शहर अध्यक्षा वर्षा नाईक, भाजप नेते कमलाकर घरत, किशोर मोरे, शैलेश पाटील, सरोज मोरे, शिवानी रावते, वैशाली पाटील, सोनाली कुदळे, वनिता गोरेगावकर, सुजाता पाटील, पल्लवी पाटील आदी उपस्थित होते.

## नवीन पनवेलच्या भुयारी मार्गातील पाण्यामुळे अपघात

**पनवेल : प्रतिनिधी**



नवीन पनवेलमधून पनवेल (तक्का)मध्ये जाण्यासाठी रेल्वेने बांधलेल्या भुयारी मार्गात पाणी साचल्याने पाण्यातून वाहन चालकांना गाडी चालवण्यास भाग पडत असल्याने दुचाकी घसरून अपघात होत आहेत.

गाढी नदीच्या काठावर १० करोडपेक्षा जास्त रुपये खर्च करून हा भुयारी मार्ग बांधण्यात आला आहे. यामध्ये सिमेंटचे चार ब्लॉक तयार करून बसवण्यात आले आहेत. पावसातच या मार्गामध्ये तांत्रिक चुका झाल्याने पाणी साचत असून वाहनचालकांना त्रास होत आहे. या मार्गाच्या दोन्ही बाजूला ब्लॉक संपतात त्या ठिकाणी मार्गातील पाणी जाण्यासाठी गटार ठेवण्यात आले आहे. या गटाराची उंची ही आतील सिमेंट ब्लॉकपेक्षा जास्त असल्याने आत साठलेले पाणी तसेच राहत आहे. याशिवाय त्याठिकाणी वाहून येणारी माती नदीच्या पात्रात न जाता तेथील दुभाजका जवळील जाळीला अडकून राहून गटार मातीने भरून जाते. त्यामुळे वरून येणारे पाणी नवीन पनवेलकडे येण्याचा मार्ग असलेल्या ब्लॉकमध्ये जाते तेथून पाण्याचा निचरा होण्यासाठी दूसरा मार्ग नसल्याने वाहन चालकांना या पाण्यातून गाडी न्यावी लागत आहे. आतमध्ये शेवाळ झाल्याने दुचाकी वाहने घसरत आहेत. त्यातच रात्रीच्या वेळेस या मार्गात विजेची सुविधा नाही, त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ यांनी याबाबत सिडको अधिकाऱ्यांच्या बरोबर झालेल्या बैठकीत याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर सिडकोच्या अधिकाऱ्यांनी गटार साफ केले होते, पण सध्या पुन्हा तिच अवस्था आहे. एखादी दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार आहे, का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

> **आम्ही भुयारी मार्ग बांधून दिल्यानंतर त्याचा ताबा सिडकोला दिला असल्याने त्याची जबाबदारी सिडकोची आहे, तरी पण मी जाऊन तांत्रिक अडचण काय आहे, त्याची पाहणी करेन.**
> **-पाईकराव, सीनियर सेक्शनल इंजिनियर, रेल्वे**

> **भुयारी मार्गाच्या गटारात बसवलेली जाळी फिक्स आहे. ती जर काढण्याची सोय असती, तर गटार साफ करणे सोयीचे झाले असते. आम्ही दोन वेळा हाताने साफ करून घेतले, पण आठ दिवसांत पुन्हा भरते. त्यामुळे रेल्वेने ती जाळी काढता येणारी बसविल्यास हा प्रश्न सुटेल.**
> **-संतोष साळी, एईई, सिडको**

## पनवेलमधील राजीव गांधी उद्यानात विविध सुविधा

### मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील राजीव गांधी उद्यानाचा पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पुर्नविकास करण्यात आला आहे. या पुर्नविकासाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने या पुर्नविकसित उद्यानाचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कल्पतरू सोसायटी १-२चे अध्यक्ष प्रशांत बाळाराम ठाकूर, ३-४चे अध्यक्ष पनीर सेल्वम व कल्पतरू वॉटरफ्रंटचे अध्यक्ष पुरुषोत्तम तळेकर यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) झाले.

या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भार्गव ठाकूर, मनोज आंग्रे, अजिंक्य जाधव, रोहन माने, संजोत शेळके आदी उपस्थित होते.





**उलवे नोड : आमदार महेश बालदी, माजी खासदार संजीव नाईक व माजी महापौर सागर नाईक यांच्या प्रयत्नाने बेलापूर ते न्हावे गावापर्यंत एनएमएमटी सेवा सुरू झाली आहे. शनिवारी या बससेवेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी आमदार महेश बालदी, माजी महापौर सागर नाईक यांच्यासह न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, चंद्रकांत भोईर, मंजुषा ठाकूर, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, सागर ठाकूर, किसान पाटील, शैलेश पाटील, तुषार भोईर, दीपक भोईर, विनोद पाटील, देवेंद्र भोईर, मोरेश्वर पाटील, दर्शन ठाकूर, सी. जे. पाटील, मीना पाटील, रंजना घरत, चंद्रलेखा भोईर, सुशिला पाटील, कमलाबाई म्हात्रे, राजू कोळी आदी उपस्थित होते.**




**पनवेल : भारतीय स्वातंत्र्याला यंदा ७५वर्षे पूर्ण झाल्याने देशभर अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली १३ ते १५ ऑगस्टदरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर दिघाटी येथील स्मरणिका शिरीष ठाकूर या लहानगीने भारतीय ध्वज हाती घेत या अभियानात मोठ्या उत्साहाने सहभागी होण्याचा निर्धार केला आहे.**



## पनवेलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव कार्यक्रम

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वरमंदिर प्रतिष्ठान मुंबई, या संस्थेच्या माध्यमातून गुरुपौर्णिमा उत्सव कार्यक्रमाचे आयोजन आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. तसेच पंडित बाबादास तुपे गुरुजी यांच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल मनपा माजी सभागृह नेते परेश ठाकूर उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ गायक आणि रंगकर्मी चंद्रकांत कोळी आणि गायिका सुमित्रा सामंत यांची विशेष उपस्थिती दर्शवली. पंडित बाबादास तुपे गुरुजींच्या सर्व शिष्यांनी शास्त्रीय आणि सुगम गायनाची बहारदार मैफल सादर केली. गायक जितेंद्र तुपे आणि उदेश उमप हे या संस्थेचे विश्वस्त असून पंडित बाबादास तुपे गुरुजी हे मुख्य विश्वस्त आहेत. शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार व्हावा हा गुरुजींचा उद्देश असून त्या दिशेने प्रतिष्ठान कार्यरत आहे.

## खांदा कॉलनीमध्ये व्यवसाय कार्यालयाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी सेक्टर १३ येथे नव्याने साई आर्ट हे साईन बोर्ड मॅन्युफॅक्चररचे कार्यालय सुरू करण्यात आले आहे. मंगेश ठाकूर यांनी सुरू केलेल्या नवीन व्यवसायाचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ६) झाले. या वेळी त्यांनी मंगेश ठाकूर यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समितीचे माजी सभापती मनोहर म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, एकनाथ गायकवाड, कामगार आघाडीचे पनवेल शहर अध्यक्ष मोतिलाल कोळी, भिमराव पोवार, गणेश पवार, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवि जोशी, युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, अनंत कांबळे, प्रवीण भोसले, संजय कांबळे, राहुल कांबळे, प्रविण पाटील, ऋषिकेश साबळे, राहुल पोवार, रोहित कोळी, अतिष पाटील, प्रदीप इंगळे, विजय कदम, रोहण भगत, अनंता ठाकूर, संतोष इंगळे आदी उपस्थित होते.





# विद्यार्थ्यांवर कौतुकाची थाप

**खारघर : प्रतिनिधी**



कठीण परिस्थितीत व्यवसाय करून आपल्या पाल्यांना उच्च शिक्षित बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या रिक्षा चालकांच्या मुलांचा दहावी, बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. खारघर शहरातील एकता रिक्षा संघटनेच्या वतीने दि.७ रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. स्थायी समिती समितीचे माजी सभापती अॅड. नरेश ठाकूर व माजी नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

शहरातील एकता रिक्षा संघटना ही रिक्षाचालकांची संघटना आहे. जवळपास हजार रिक्षा चालकांचा समावेश या संघटनेत आहेत. या वेळी दोन्ही स्थायी समितीच्या माजी सभापतींनी रिक्षा चालकांचे व त्यांच्या पाल्यांचे कौतुक केले. अॅड. नरेश ठाकुर यांनी भविष्यात प्रशासकीय सेवेत उच्च पदावर बसण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले, तर प्रवीण पाटील यांनी आजच्या घडीला रिक्षाचालक आपल्या राज्याचा मुख्यमंत्री असल्याने स्वतःला कमी न लेखात आपण रिक्षा चालकांची मुले आहोत हे अभिमानाने सांगा असे प्रवीण पाटील यांनी सांगितले.

समाजात एवढे मोठे व्हा की, अभिमानाने आपल्या पालकांची नावे समाजात घेतली जातील. या वेळी जवळपास ६०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा झाला. विद्यार्थ्यांना मानधन, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या वेळी नवी मुंबई प्रकल्पग्रस्त आगरी कोळी रिक्षा महासंघाचे प्रसन्न कडू, राजेश पाटील, श्रीनिवास पाटील, विकास सूर्यवंशी तसेच कोंकण विभाग रिक्षा महासंघाचे प्रणव पेणकर, राजु राऊत, एकनाथ पिंगळे व एकता रिक्षा संघटनेचे कमलाकर ठाकूर, किसन म्हात्रे, उत्तम तांबडे, मेघनाथ म्हात्रे, गुरुनाथ पाटील, जयेंद्र कोळी, प्रवीण म्हात्रे, नितीन भगत आदींसह मोठ्या एकता रिक्षा संघटनेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## स्व. किशोर कुमार यांना आदरांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महान गायक स्व. किशोर कुमार यांच्या जयंतीनिमित्ताने कलासागर परिवार आणि सामाजिक कार्यकर्ते, रवी नाईक यांच्या संकल्पनेने गुरुवारी (दि. ४) साई देवस्थान वहाळ येथे आदरांजली वाहण्यात आली.

या वेळी गोल्डन हिट्स ऑर्केस्ट्राचे निर्माता दिग्दर्शक, गायक अजीत मेस्त्री यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी पांडुरंग सस्ते, राजेश चौधरी, नरेश तोडकर, रमाकांत म्हात्रे, पुरुषोत्तम म्हात्रे, राज म्हात्रे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात गायक रवी नाईक, गोपाळ पाटील पी. सी. म्हात्रे, समाधान पाटील, जीतू पाटील अजीत मेस्त्री, पांडुरंग सस्ते, राजेश चौधरी यांनी स्व. किशोर कुमार यांची गाणी गायली. सूत्रसंचालन निर्माता श्रीकांत मुंबईकर यांनी केले.



## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३१

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वात अधिक आहे?**
***अ.*** इंडियन ऑईल ***आ.*** बीपीसीएल ***इ.*** ओएनजीसी ***ई.*** एचपीसीएल

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
***अ.*** जिओ ***आ.*** भारती एअरटेल
***इ.*** व्होडाफोन आयडिया ***ई.*** टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
***अ.*** एचडीएफसी बँक ***आ.*** आयसीआयसीआय बँक
***इ.*** कोटक महिंद्रा बँक ***ई.*** स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# मंकीपॉक्सची दहशत

कोरोनाचे अद्याप समूळ उच्चाटन झालेले नसताना मंकीपॉक्स विषाणूने आफ्रिका, युरोपसह जगभरात आपली दहशत निर्माण केली आहे. जगातील अनेक देशांत मंकीपॉक्सचे नवे रुग्ण दररोज आढळत आहेत. भारतातही या संसर्गजन्य आजाराने शिरकाव केला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

**सन २०२० आणि २१ ही दोन वर्षे कोरोनाच्या महाभयंकर संक्रमण काळात गेली. त्यामुळे जगभर उद्‌भवलेली आरोग्यविषयक परिस्थिती आणि त्याचे एकूणच मानवी जीवनावर झालेले परिणाम सर्वांनीच अनुभवलेले आहेत. त्यानंतर आता २०२२मध्ये मंकीपॉक्सने भय निर्माण केले आहे. कांजण्या म्हणजेच चिकनपॉक्स प्रकारातील हा एक डीएनए व्हायरस आहे. अंग तापाने फणफणणे, सर्दी, खोकला, पुरळ उठणे अशी त्याची लक्षणे आहेत. या आजारात सुरुवातीला उठलेली पुरळ वाढत जाते आणि त्याचे फोडात रूपांतर होते. त्यात पाणी भरले जाते. मग पू भरल्यासारखी ते पिवळसर होतात. शेवटी त्याच्या खपल्या बनतात आणि ते शेवटी झडतात. हे सर्व व्हायला किमान १२ ते १५ दिवस लागतात तसेच याचा खूप त्रास होतो. गंभीर बाब म्हणजे बरे झाल्यानंतरही या फोडांचे व्रण कायम राहतात. सुरुवातीला काही माकडांमध्ये हा आजार पसरला. म्हणून याला मंकीपॉक्स असे नाव पडले, पण हा आजार प्राण्यांमधून माणसांमध्ये पसरू लागला आणि आज तो जगभरातील विविध शहरांमध्ये पसरताना पहायला मिळत आहे. अनेक देशांमध्ये मंकीपॉक्सची रोज नवनवीन प्रकरणे समोर येत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने या आजाराचा वेगाने होत असलेला प्रसार पाहता संसर्गजन्य रोगावर पाळत ठेवण्याचे आवाहन केले आहे. यूकेमध्ये मंकीपॉक्सचे पहिले प्रकरण समोर आल्यानंतर त्याचा प्रसार अन्य देशांमध्ये झाला. यात काही रुग्णांचा मृत्यू झाला आहे. या आजाराची लागण होऊन मृत्युमुखी पडलेल्यांचे प्रमाण कमी असले तरी रुग्णवाढ सुरूच आहे. त्यामुळे चिंता व्यक्त होत आहे. अमेरिकेत मंकीपॉक्सचा प्रादुर्भाव वाढला असून त्यामुळे तेथे आरोग्यविषयक आणीबाणी लागू करण्यात आली आहे. भारतातही मंकीपॉक्सचे काही रुग्ण आढळून आले आहेत. देशात सर्वप्रथम केरळमध्ये याचा रुग्ण आढळला. त्यानंतर राजधानी दिल्लीतही रुग्ण आढळले आहेत. केरळमधील एका मंकीपॉक्सबाधित रुग्णाचा मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. हा रुग्ण यूएईवरून आला होता. त्याचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले असून आरोग्य विभाग अधिक तपासणी करीत आहे. तत्पूर्वीच केंद्र सरकारने याबाबत दक्षता घेत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मंकीपॉक्सवर शासकीय–प्रशासकीय पातळीवर प्रतिबंध व उपाययोजना करण्यात येत असताना वैयक्तिक स्तरावरही अनेक गोष्टी आपल्यालाही करता येतील. कोरोना आणि मंकीपॉक्स हे आजार जरी वेगवेगळे असले तरी दोन्हींबाबत मास्क–ग्लोव्हज वापरणे, विलगीकरण, स्वच्छता अशा सामायिक पद्धती अवलंबणे आवश्यक आहे. रोगप्रतिकारक शक्ती चांगली ठेवण्यासाठी फळे, भाज्या, दूध यांचे सेवन करणे कधीही चांगले. मंकीपॉक्सचा सर्वाधिक धोका गर्भवती महिला व लहान मुलांना असल्याचे म्हटले जात असल्याने त्यांनी अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मंकीपॉक्ससंदर्भातील माहिती वेळोवेळी आरोग्य मंत्रालयाकडून दिली जात आहे. त्यामुळे त्याकडे लक्ष ठेवून अफवांवर विश्वास न ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे.**

# सोलनपाडा धरणाकडे पर्यटक आकर्षित



पावसाळ्यात जामरुख नावाने नोंद असलेले सोलनपाडा येथील जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाचे धरण ओव्हरफ्लो झाले की, त्या भागातील निसर्गसौंदर्यांत भर पडते. या निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी निसर्गप्रेमी सोलनपाडा येथे येऊन ठाण मांडतात. कर्जत या तालुक्याचे ठिकाणापासून २५ किलोमीटर असलेल्या सोलनपाडा येथील पाझर तलाव ओव्हरफ्लो झाल्यानंतर निसर्गप्रेमी यांच्यासाठी हा आनंदाचा क्षण असतो.



**खबरबात**
संतोष पेरणे

१९८०च्या दशकात जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाने जामरुख येथे पाच लाख रुपये खर्च करुन पाझर तलाव बांधला. पुढे २०१२मध्ये या तलावाची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करताना पाणीसाठा वाढवा यासाठी खोली अधिक करण्यात आली आणि मातीचा बांध आणखी मजबूत करण्यात आला. त्यामुळे लहान धरणात रूपांतर झालेल्या या धरणाच्या मुख्य जलाशयात कोणालाही जाण्यास पूर्वी परवानगी नव्हती आणि आजदेखील नाही. परंतु पाटबंधारे विभागाने अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी सांडव्याची केलेली रचना ही पर्यटकांना आकर्षित करणारी आहे. धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर तेथील अतिरिक्त पाणी बाहेर पडण्याचा मार्ग अधिक भक्कम करताना सांडवा नव्या पद्धतीने बांधून तयार केला. या सांडव्याचे नवीन रूप हे त्यातून पाणी खाली जाताना आणखी आकर्षक दिसते. २०१५मध्ये पावसाळ्यात पहिल्यांदा या धरणाच्या सांडव्यामधून पाणी भरून वाहू लागले होते आणि पर्यटक तसेच निसर्गप्रेमी या पाझर तलावाच्या प्रेमात पडले.

सोलनपाडा धरण भरल्यानंतर त्याच्या सांडव्यामधून पाणी बाहेर पडू लागले की, त्या क्षणाचा आनंद घेण्यासाठी धरण ओव्हरफ्लो होतानाचा अनुभव घेण्यासाठी हजारो वर्षासहल प्रेमी हे गर्दी करीत असतात. जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे खात्याने बांधलेल्या जामरुख सोलनपाडा येथील पाझर तलावाची दुरुस्ती करताना केलेली रचना यामुळे निसर्गप्रेमी सोलनपाडा धरणाच्या प्रेमात पडले आहे. त्यात त्या ठिकाणी जाण्याचे मार्गदेखील निसर्ग सौंदर्याने भरलेला आहे. रस्त्याच्या आजुबाजूला प्रचंड प्रमाणात हिरवाई आणि आजुबाजूने वाहणारे ओढे यामुळे त्या भागात पर्यटक आणि निसर्ग प्रेमी पोहचल्यावर आनंदी असतो. त्यामुळे धरणाच्या परिसरात पोहचल्यावर कोणताही व्यक्तीला भिजण्याचा मोह रोखू शकत नाही.

### शासनाची पर्यटकांना बंदी

**त्या धरणाच्या परिसरात पर्यटक पोहचल्यावर धरणाच्या मुख्य जलाशयात जाण्याचा मोह करतात आणि त्यामुळे अनेक अपघात झाले आहेत. वारंवार होणारे सोलनपाडा धरण परिसर प्रशासनाने पर्यटकांसाठी बंद केले आहे**

## बदलते तंत्रज्ञान

### 'या' उपकरणांचा वापर थांबवा; विजेचे बिल होईल कमी!

घराचे वीज बिल अनेकांची डोकेदुखी बनले आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाला घराचे वीज बिल कमी करायचे असते, परंतु अनेक उपकरणांच्या सतत वापरामुळे हे शक्य होत नाही. आज आम्ही तुम्हाला अशा उपकरणांविषयी टिप्स देणार आहोत जी उपकरणे काढून टाकल्यानंतर तुम्ही तुमच्या घराचे वीज बिल कमी करू शकता.

चिमणीचा वापर सामान्यतः स्वयंपाकघरात केला जातो, पण तुम्हाला माहीत आहे का की ते सर्वांत जास्त वीज बिल घेणाऱ्या उपकरणांच्या यादीत समाविष्ट आहे. तथापि, उन्हाळ्याच्या हंगामात चिमणी चालवणे आवश्यक बनते, परंतु त्याबद्दल घाबरण्याची गरज नाही, कारण त्याच्या जागी बाजारात इतर अनेक गोष्टी आहेत ज्या तुम्ही चिमणीऐवजी वापरू शकता. शिवाय त्याचा वापर केल्याने वीज बिलही खूप कमी येऊ लागते.


गिझरमुळे घरातील वीज खूप जाते. अशा परिस्थितीत आपण खूप सावध असणे आवश्यक आहे. विशेषतः इलेक्ट्रिक गिझरचा त्रास होऊ शकतो. म्हणूनच आपण त्याऐवजी दुसरा पर्याय शोधणे फार महत्वाचे आहे. त्याऐवजी गॅस गिझर हा सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. इलेक्ट्रिक गिझरऐवजी तुम्ही गॅस गिझर वापरू शकता. हा गिझर केवळ काम चांगले करीत नाही, तर विजेचीही खूप बचत करते.

घरातील सर्वाधिक वीज वापरणाऱ्या उपकरणांच्या यादीत एसीचा समावेश आहे, पण हे एक उपकरण आहे जे तुम्ही घरातून काढू शकत नाही, मात्र तुम्ही नॉन–इन्व्हर्टर एसीऐवजी इन्व्हर्टर एसी वापरू शकता. इन्व्हर्टर एसी म्हणजे विजेची बचत करणे, कारण त्याच्या आउटडोअरमध्ये पीसीबी आहे जो कंप्रेसरचा वेग नियंत्रित करतो.

याशिवाय तुम्ही अनेक बदल करू शकता. जसे एसीची सर्विसिंगसुद्धा खूप आवश्यक आहे. अनेक वेळा सर्विस नसल्याने तुम्ही जर एसी चालवत असाल, तर ही एकदम कुलिंग करीत नाही. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी सर्विसमुळे विजेचे बिल कमी येत असल्याची माहिती देत आहोत, कारण एकदा सर्विस केल्यानंतर एसीची कूलिंग डबल होते. कूलिंग केल्यानंतर एसीची हवा गार मिळते. मग त्याचा वापरही जास्त करावा लागत नाही. परिणामी बिलात फरक पडू शकतो.

बाजारात एलईडी बल्ब उपलब्ध आहेत. ट्युबलाइटऐवजी वॅटनुसार एलईडी बल्बचा वापर करता येऊ शकतो. अशा प्रकारे अनके छोट्या–छोट्या गोष्टींतून तुम्ही वीज बिलात कपात करू शकतात.

# सिने अभिनेते–निर्माते दादा कोंडके



**निमित्त**

कृष्णा कोंडके ऊर्फ दादा कोंडके यांची मराठी अभिनेते व चित्रपट–निर्माते म्हणून खास ओळख राहिली आहे. त्यांनी मराठी वगनाट्यातून व चित्रपटांतून अभिनय केला. द्विअर्थी, विनोदी ढंगातील संवादफेकीमुळे त्यांच्या भूमिका लोकप्रिय झाल्या. अभिनयासोबतच त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेत तसेच हिंदी आणि गुजराती भाषेतील चित्रपटांची निर्मिती केली.

दादा कोंडकेंचे खरे नाव कृष्णा कोंडके होते. मुंबईच्या नायगाव येथील मिलमजूर कामगाराच्या घरात गोकुळाष्टमीला जन्मलेल्या या कृष्णाने नावाचे सार्थक मराठी चित्रपटसृष्टीच्या पडद्यावर दाखवून दिले. बँड पथकातून सुरुवात करून हळूहळू वगनाट्ये, नाटके यांनी सुरुवात केलेल्या दादांचे चित्रपट जीवन मेहनतीने साकारले गेले. नाटकांच्या निमित्ताने केलेल्या राज्यभराच्या दौऱ्यांनी दादांना सर्वसामान्यांसाठी करमणुकीचे महत्त्व व कोसा–कोसांवर बदलत जाणारी रसिकता कळली व हेच पुढे त्यांच्या यशाचे गमक सिद्ध झाले.

दादांचे बालपण नायगावच्या मराठी कामगार वस्तीतल्या चाळीत गेले. लहानपणापासून खट्याळ असलेल्या दादांनी 'अपना बाजार' येथे नोकरी केली. नायगाव परिसरात–बँडवाले दादा या नावाने त्यांना लोक ओळखू लागले. तेथेच त्यांना जीवाभावाचे मित्र मिळाले. सुपरस्टार झाल्यावरही दादा तेथे जात व जुन्या मित्र मंडळीत रमत.

'विच्छा माझी पुरी करा' या वसंत सबनीस–लिखित वगनाट्यामुळे अभिनेता म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स. १९६९ साली भालजी पेंढारकरांच्या तांबडी माती चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा (इ.स. १९७३), पांडू हवालदार (इ.स. १९७५), राम राम गंगाराम (इ.स. १९७७), बोट लावीन तिथे गुदगुल्या (इ.स. १९७८) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होते.

कलेची सेवा बँड पथकाच्या मार्फत करणाऱ्या दादांनी मग 'सेवा दलात' प्रवेश केला. तेथून सांस्कृतिक कार्यक्रम व नंतर नाटके असा त्यांचा प्रवास सुरू झाला. दादांनी 'दादा कोंडके आणि पार्टी' नावाचे एक कलापथकही काढले. प्रख्यात लेखक वसंत सबनिसांशी ते याच संदर्भातून जोडले गेले. स्वतःची नाटक कंपनी उघडून त्यांनी वसंत सबनिसांना नाटकासाठी लेखन करावयास विनंती केली. तोवर वसंत सबनिसांना त्यांच्या खणखणपूरचा राजा या नाटकातल्या भूमिकेने प्रभावित केलेलेच होते. हसरे व खेळकर व्यक्तिमत्त्व लाभलेल्या दादा कोंडकेंसाठी सबनिसांनी मदतीचा हात पुढे केला. सबनिसांनी लिहिलेल्या 'विच्छा माझी पुरी करा' या नाटकाने दादांना सुपरस्टार रंगकर्मी बनवले. १५००च्या वर प्रयोग झालेल्या या नाटकामुळे दादांना भालजींच्या चित्रपटात काम करण्याची संधी प्राप्त झाली. नेमक्या ठिकाणी पॉज घेतल्याने प्रेक्षक अख्खे थिएटर (मग ते नाटकाचे असो की सिनेमाचे) डोक्यावर घ्यायचे.

१४ मार्च १९९८ रोजी पहाटे ३.३०ला रमा निवास या दादरच्या निवासस्थानी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना बाजूच्याच सुश्रूषा नर्सिंग होममध्ये हलविण्यात आले. आदल्याच दिवशी त्यांचे स्नेही डॉ.अनिल वाकणकरांनी त्यांना तपासले होते, पण शेवटी त्यांचे सुश्रूषा हॉस्पिटलात प्राणोत्क्रमण झाले.

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : यंदा चांगल्या पावसामुळे परिसर निसर्गाने बहरून गेला आहे. जून महिन्यात ओढ देणारा वरुणराजा नंतर जोरदार बरसला. त्यामुळे ग्रामीण भागात शेत, वने, डोंगर, झाडे–झुडपे यांची वनराई तयार झालेली पहावयास मिळते. त्यामुळे जनावरांना ताजा चारा उपलब्ध झाला आहे. हा चारा पोषक असतो. म्हणूनच तो आपल्याजवळील बकऱ्यांना देण्यासाठी मेंढपाळ महिला त्यांना चरायला घेऊन जात असताना छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात आवर्जून प्या लिंबाच्या सालीचा चहा!

लिंबाची साल विना उपयोगाची म्हणून सरळ फेकून दिली जातात, पण अभ्यासाचे निष्कर्ष सांगतात की लिंबाच्या रसापेक्षा सालींमध्ये जास्त सत्वं असतं. लिंबाच्या सालीत असलेले जैविक घटक आरोग्यासाठी फायदेशीर असतात. त्याचा आरोग्यासाठी उपयोग करून घेण्याची सोपी पद्धत आहारतज्ज्ञ सिमरन सैनी यांनी सांगितली आहे. त्या सांगतात की लिंबाच्या सालींमध्ये जीवनसत्वे, खनिजे आणि फायबर असतात. त्याचा उपयोग आरोग्यास करून घेण्यासाठी लिंबाच्या सालींचा चहा करून पिण्याचा सल्ला देतात. लिंबाच्या सालीचा चहा प्यायल्यानं आरोग्यास अनेक फायदे होतात.

लिंबाच्या सालींच्या चहामध्ये डी लिमोनेन, क जीवनसत्वे आणि ॲण्टी–ऑक्सिड्ण्टस असतात. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यासाठी, हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी लिंबाच्या सालींच्या चहाचा चांगला उपयोग होतो.

लिंबाच्या सालींच्या चहामध्ये जिवाणुविरोधक गुणधर्म असतात. लिंबाच्या सालींच्या चहामध्ये फ्लेवोनॉइड्स आणि क जीवनसत्वे असल्याने त्याचा उपयोग वजन कमी करण्यासाठी होतो. तसेच यामुळे त्वचेचा पोतही सुधारतो.

सर्दी, खोकला यासारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी, चयापचय क्रिया सुधारण्यासाठी लिंबाच्या सालींचा चहा प्रभावी असतो. लिंबाच्या सालींमध्ये डी लिमोनेन हे फ्लेवोनॉइड ॲण्टी–ऑक्सिड्ण्टस असतात. त्यामुळे लिंबाच्या सालींचा चहा प्यायल्यानं हृदयरोग, टाइप २ मधुमेह यासारख्या आजारांचा धोका कमी होतो.

लिंबाच्या सालींमध्ये असलेल्या क जीवनसत्वामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. आजारी पडण्याची लक्षणे दिसताच लिंबाच्या सालींचा चहा प्यायला सुरुवात केल्यास आजाराचा धोका टळतो किंवा आजाराची तीव्रता कमी होते.

लिंबाच्या सालीत थोड्या प्रमाणात पोटॅशियम असते, जे शरीरातील पेशींसाठी उपयुक्त असत. खूप घाम येण्याची समस्या असल्याच लिंबाच्या सालींचा चहा अवश्य प्यावा.

पचनक्रिया सुधारण्यासाठी लिंबाच्या सालीतील गुणधर्मांचा उपयोग होतो. लिंबाच्या सालीत असलेल्या फायबरमुळे पचनक्रिया सुदृढ होते. लिंबाच्या सालीचा चहा प्यायल्यानं आतड्यांना असलेली सूज कमी होऊन चयापचय क्रिया सुधारण्यास मदत होते. लिंबाच्या सालीचा चहा करण्यासाठी लिंबाची साली, १ कप पाणी, आल्याचा छोटा तुकडा आणि १ मोठा चमचा मध घ्यावे. चहा करण्यासाठी भांड्यात लिंबाची साली, आल्याचे तुकडे आणि १ कप पाणी घालावं. ते २–३ मिनिटे उकळून घ्यावे. पाणी गाळून घ्यावे त्यात मध घालून चहा प्यावा. लिंबाच्या सालीत असलेले जैविक घटक आरोग्यासाठी खूपच फायदेशीर असतात.


# जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत मोजतेय अखेरची घटका

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

जिल्हा शासकीय रुग्णालयातील मेल सर्जीकल कक्षात २७ जुलै स्लॅबचा काही भाग कोसळला. सुदैवाने कोणीही रुग्ण स्लॅब पडलेल्या ठिकाणी नसल्याने पुढील अनर्थ टळला आहे. रुग्णालयाची इमारत जीर्ण झाली आहे. या इमारतीत स्लॅब कोसळणे, गळती, शौचालय नादुरुस्त अशा अनेक समस्यांनी रुग्णालय सध्या ग्रासले आहे. या रुग्णालयात येणारे रुग्ण, दाखल असलेले रुग्ण नातेवाईक, कर्मचारी, डॉक्टर भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालय इमारत अखेरची घटका मोजत आहे.

अलिबाग येथे ३८ वर्षापूर्वी जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत बांधण्यात आली. जिल्हा शासकीय रुग्णालय इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट २०१२ साली करण्यात आले. इमारत दहा वर्षांसाठी उत्तम असल्याचा अहवाल देण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने पुन्हा २०२१साली इमारतीचे लाखो रुपये खर्च करून स्ट्रक्चरल ऑडिट केले. पुन्हा इमारत सुस्थितीत असल्याचा अहवाल देण्यात आला आणि पुन्हा दुरुस्ती सुरू झाली. दुरुस्तीच्या नावे करोडो रुपये खर्च केला जात आहे.







## रुग्णालयात डॉक्टरांची अनेक पदे रिक्त

जिल्हा शासकीय रुग्णालयात डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत. जिल्ह्यातील रुग्णांना उपचारासाठी भरपूर पैसे मोजून खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घ्यावे लागत आहेत. तसेच मुंबईतील शासकीय रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे. जिल्हा रुग्णालय हे मुख्य शासकीय रुग्णालय आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातून रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयात येतात. परंतु डॉक्टरच नसल्यामुळे त्यांच्यावर उपचार होत नाहीत. जिल्हा रुग्णालयात वर्ग १ ची १९ पद मंजूर आहेत. यापैकी तीन पदे भरलेली आहेत. त्यापैकी एक डॉक्टर गैरहजर आहेत. याचा अर्थ तज्ज्ञ डॉक्टरांची १७ पदे रिक्त आहेत. वर्ग दोनसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३१ पदे मंजूर आहेत. यातील २८ पद भरलेली आहेत. बालरोगतज्ज्ञ, क्ष-किरणतज्ज्ञ, चर्मरोग, क्षयरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, नेत्राचिकित्सक, दंतचिकीत्सक, शस्त्रक्रियातज्ज्ञ, फिजिशिअन, दंतचिकीत्सक यासारखे तज्ज्ञ डॉक्टर रुग्णालयात उपलब्ध नाहीत, त्यामुळे रुग्णांवर उपचार होत नाहीत. शस्त्रक्रियादेखील होऊ शकत नाहीत. वर्ग तीन संवर्गातील २४० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १८७ पदे भरली आहेत. ५३ पदे रिक्त आहेत. अधिसेविका , सहाय्यक अधिसेविका, परिसेविका, बालरोग परिसेविका, मनोविकृती परिसेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, भौतिक उपचार तंत्रज्ञ, दंत यांत्रिकी, भांडारपाल, स्वच्छता निकीक्षक ही पदे रिक्त आहेत. वर्ग चार संवर्गातील तब्बल ७५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे मनुष्यबळ कमी पडत आहे. अतिरिक्त कामाचा कर्मचाऱ्यांवर ताण पडतोय. ही पदे तातडीने भरली गेली पाहिजेत.

त्यामुळे पुन्हा इमारतीमध्ये करोडोची दुरुस्तीची कामे करण्यात आली. दुरुस्तीवर करोडो रुपये खर्च करून देखील या इमारतीमध्ये छताचा भाग कोसळणे, गळती लागणे असे प्रकार घडतच आहेत.

जिल्हा सामान्य रुग्णालय इमारतीवर आतापर्यंत पंधरा ते वीस कोटीहून अधिक खर्च झाला आहे. मात्र एवढा खर्च करूनही इमारत ही जीर्णच राहिली आहे. अद्यापही अनेक विभागात छोटी मोठी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत आजही सुरू आहेत. मात्र ही कामे अर्धवट असून याचा फटका रुग्णांना, कर्मचारी यांना बसत आहे. जिल्ह्याचे रुग्णालय असल्याने पोलादपूर पासून रुग्ण हे अलिबाग येथे तपासणीसाठी येत असतात. मात्र रुग्णालयाची अवस्था पाहून बरा होणारा रुग्णही पुन्हा आजारी पडू शकतो अशी अवस्था रुग्णालयाची झाली आहे. याकडे दुर्लक्ष होत आहे.

जिल्हा रुग्णालय इमारतीमध्ये अद्यावत असे शस्त्रक्रिया कक्ष बनविण्यात आलेला आहे. यावर करोडो रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. आजही या कक्षात कामे सुरू आहेत. मात्र कामे करूनही शस्त्रक्रिया कक्षात पावसामुळे गळती लागली आहे. त्यामुळे कर्मचारी कक्ष, चेंजिग रूम, शस्त्रक्रिया कक्ष यामधील छतातून ठिंबक सिंचन सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक कक्षात बादल्या ठेवल्या जातात. जिल्हा रुग्णालयात किमान दोन ते तीन शस्त्रक्रिया होत असतात. त्याचबरोबर सिझर शस्त्रक्रियाही या कक्षात होत असतात. मात्र गेले महिनाभर या कक्षात सिझर शस्त्रक्रियेशिवाय दुसऱ्या शस्त्रक्रिया झालेल्या नाहीत. त्यामुळे इतर शस्त्रक्रिया रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत आहे. या इमारतीची दुरुस्ती करून खर्च वाया घालवण्यापेक्षा जुनी इमारत पडून तेथे नवीन इमारत बांधणे हाच योग्य पर्याय आहे.



**भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना पेण सुधागड रोहा विधानसभा समन्वयक वैकुंठ पाटील, भाजपा उपजिल्हाध्यक्ष राजेश मापारा, आलाप मेहता, तालुका सरचिटणीस आनंद लाड व शहराध्यक्ष सचिन मोदी.** (छाया : राज वैशंपायन)



**भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस उत्साहात झाला. या वेळी त्यांना शुभेच्छा देताना भाजप अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, भाजपा ओबीसी सेल अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे, भाजप अलिबाग तालुका युवा सचिव निखिल चव्हाण आदी.** (छाया : प्रकाश सोनवडेकर)

## रोहा तालुका झाला कोरोनामुक्त

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुका कोरोना मुक्त झाला आहे. रोहेकरांसाठी हे दिलासादायक वृत्त आहे. तालुक्यात आता कोरोनाचा एकही सक्रिय रुग्ण नाही. तालुक्यात तीन नवे रुग्ण मिळाले होते. मात्र ते कोरोनामुक्त झाले आहेत. यामुळे शनिवारी एकही नवा रूग्ण न सापडल्याने रोहा तालुका कोरोना मुक्त झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातून मिळालेल्या माहितीनुसार कोरोना संसर्ग कमी होताना दिसत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील काही तालुके कोरोना मुक्तीवर आहेत. शनिवारी आलेल्या माहिती नुसार रोहा तालुक्यात एकही सक्रिय रुग्ण नसल्याने रोहा तालुका कोरोना मुक्त झाला आहे. रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यासह महाड व तळा तालुका शनिवारी कोरोना मुक्त झाला आहे. दरम्यान, जिल्ह्यात ३७ नवे कोरोना रुग्ण सापडले असून ३० रुग्णांनी कोरोनावर मात केल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

# नागोठणेत वारंवार बत्तीगुल

## भाजपच्या वतीने तीव्र जनआंदोलन

**नागोठणे : प्रतिनिधी**

शहरात वारंवार होणारी बत्तीगुल व काही ठिकाणचे पथदिवे लागत नसल्याने त्याची त्वरित दखल घ्यावी अन्यथा भाजपच्या वतीने तीव्र जनआंदोलन करणार असल्याचे निवेदन भाजप शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी शनिवार (दि. ६) महावितरणचे सहाय्यक अभियंता वैभव गायकवाड यांना दिले.

गेले अनेक दिवसांपासून शहरातील वीजपुरवठा रात्री अपरात्री वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे लहान मुलांसह वयोवृद्ध नागरिकांना जास्त त्रास होत असतो. तसेच काही ठिकाणचे पथदिवे मेंटेनन्स न केल्याने बंद असल्यामुळे रात्री अंधारात कोणीही व्यक्ती पडून दुखापत होण्याची दाट शक्यता आहे. या प्रकरणाची गांभिर्यानी दखल घ्यावी अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांना त्रास होत आहे. याची वेळीच दखल न घेतल्यास नागोठणे भाजपच्या वतीने तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा शेवटी पत्रात दिला आहे.

यावेळी महिला जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अशोक अहीरे, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष रहूफ कडवेकर यांच्यासह अपर्णा सुटे, प्रियांका पिंपळे, शीतल नांगरे, मुग्धा गडकरी, सुखदा वढावकर तसेच शहरातील भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

**वीज खंडित होत असताना येत असलेल्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न आहे. वीज खंडित होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तसेच पथदिवे लावण्यासाठी ग्रामपंचायतीकडे वीजवितरणचा एक कर्मचारी देणार असून सर्व दिवे चालू करण्याचा प्रयत्न राहील.**
**-वैभव गायकवाड, सहाय्यक अभियंता-नागोठणे**



# तलाठी अंकुश साळवे यांना सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

महसूल दिनाचे औचित्य साधून माणगाव तालुका महसूल विभागातर्फे २०२१-२२ या वर्षामध्ये उल्लेखनीय कामकाज केल्याबद्दल उतेखोल सजाचे तलाठी अंकुश लक्ष्मण साळवे यांना बुधवारी (दि. ३) उपविभागीय अधिकारी प्रशाली जाधव दिघावकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

माणगावमधील गांधी मेमोरियल हॉलमध्ये झालेल्या या महसूल दिन कार्यक्रमाला तहसीलदार प्रियांका आयरे-कांबळे, नायब तहसीलदार बी. वाय. भाबड यांच्यासह तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, लेखनिक यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

तलाठी अंकुश साळवे यांनी निसर्गचक्र वादळग्रस्तांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून, वादळग्रस्तांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम जमा होण्यासाठी दिवसरात्र काम केले. या कामगिरीची दखल घेत माणगाव महसूल विभागाने तलाठी अंकुश साळवे यांचा यावेळी यथोचित सन्मान केला.




# प्लास्टिकमुक्त भारतीय समुद्र

**सागरांतील प्रदूषण आणि त्यातही विशेषतः सागरी कचऱ्यातील प्लास्टिकचे वाढते प्रमाण या विक्राळ बनत चाललेल्या समस्येचा मुकाबला करण्यासाठी केंद्र सरकारने किनारपट्टी स्वच्छतेच्या नव्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.**



गेल्या महिन्यात पोर्तुगालची राजधानी लिस्बनमध्ये संयुक्त राष्ट्र सागर परिषदेच्या एका उच्चस्तरीय परिसंवादात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली आपली किमान ३० टक्के जमीन, पाणी आणि सागर यांच्या संपूर्ण रक्षणाची हमी घेण्याबद्दलची भारताची प्रतिबद्धता २०३०पर्यंत कालबद्ध अभियानाच्या रूपात अमलात आणली जाईल याचा पुनरूच्चार या परिसंवादात केला गेला. सागरांचे संवर्धन आणि त्यातून प्राप्त होणाऱ्या संपदेचे सातत्य याप्रती भारताची प्रतिबद्धता व्यक्त करणारे पंतप्रधानांचे दुरदर्शी धोरण १३० देशांतून आलेले मंत्री व अधिकारी यांच्यासमोर तेथे मांडले गेले.

हायम्बिशन कोअलिशन फॉर नेचर अ‍ॅण्ड पीपल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रसमुहाचा भारत एक भाग आहे. या राष्ट्रसमुहाने जानेवारी २०२१मध्ये पॅरिसमध्ये वन प्लॅनेट समिट या शिखर परिषदेचे आयोजन केले होते. त्यात २०३०पर्यंत जगभरातल्या किमान ३० टक्के जमीन, पाणी आणि सागरांच्या संरक्षणाची हमी घेण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. जागतिक सागरी शिखर परिषदेतही महासागर, समुद्र आणि सागरी संपदा यांचे संवर्धन आणि सातत्यपूर्ण वापर या संदर्भातील प्रतिबद्धता व्यक्त करणाऱ्या १४व्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल (एसडीजी)च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता ठोस वैज्ञानिक आधार असलेले नाविन्यपूर्ण व पर्यावरणस्नेही उपाय उपलब्ध करून देण्याची तयारी भारताने दाखविली आहे.

आता संयुक्त राष्ट्रसंघाच्या उच्चस्तरीय बैठकीनंतर आपली आश्वासन अमलात आणण्याची वेळ आहे. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांच्या सागरी परिषदेनंतर अवघ्या आठवडाभरातच भारताने देशभरातील ७५ ठिकाणी सागर किनाऱ्याच्या स्वच्छतेच्या मोहिमेची मोठी घोषणा केली. या मोहिमेंतर्गत किनारपट्टीच्या प्रत्येक किलोमीटर भागामागे किमान ७५ स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. स्वच्छ सागर, सुरक्षित सागर असे नाव असलेल्या आणि ७५ दिवस चालणाऱ्या या मोहिमेची सुरुवात ५ जुलै रोजी झाली. आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनी म्हणजे १७ सप्टेंबरला या मोहिमेची सांगता होईल. सर्वाधिक काळ सलग चालणारी आणि सर्वाधिक लोकांचा सहभाग असलेली ही अशा प्रकारची जगातली पहिलीच मोहीम आहे. स्वच्छ सागर, सुरक्षित सागर या मोहिमेतील सर्वसामान्यांच्या सहभागाने ही मोहीम देशाच्या अन्य भागांतील लोकांसाठीही असल्याचा संदेश सर्वदूर पोहचविला जाईल. इथे हे सांगणे उचित ठरेल की, याचवर्षी मार्च महिन्यात लोकसभेत बोलताना मी सांगितलं होतं की, सागरी कचऱ्याचा ५० टक्के भाग हा एकल वापराच्या प्लास्टिकचा असतो, असे २०१८ ते २०२१ या काळात चेन्नईच्या नॅशनल सेंटर फॉर कोस्टल रिसर्च (एनसीसीआर) या संस्थेने केलेल्या देशभरातील किनारपट्ट्यांच्या पाहणीदरम्यान दिसून आले आहे. या पाहणीत असेही लक्षात आले की, हा सागरी कचरा भरती-ओहोटीदरम्यानच्या पुळणीच्या भागात जमा न होता मागे किनारपट्टीवरच अधिक गोळा होतो आणि ग्रामीण किनाऱ्यांपेक्षा शहरी भागांतील किनारपट्टीवरच कचरा अधिक गोळा होतो. या पाहणीदरम्यान किनारपट्टीवरील पाणी, वाळू, दगड आणि सजीवांचे नमूने घेऊन त्यांची सूक्ष्म, मध्यम व मोठ्या प्लॅस्टिक प्रदूषणासाठी चाचणीही करण्यात आली. त्यात मान्सूनच्या काळात भारताच्या पूर्व किनारपट्टीवर मायक्रोप्लास्टिक प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याचे दिसून आले आहे.

नद्यांच्या मुखांपाशी असलेल्या ठिकाणी हे प्रदूषण खूपच जास्त असल्याचेही लक्षात आले आहे. या पाहणीसोबतच अन्य अनेक अभ्यासांतूनही सागरी जैवविविधता, परिस्थिती, मत्स्योत्पादन, मानवी आरोग्य आणि अर्थव्यवस्था या सर्वांवर या कचऱ्याचे कसे दुष्परिणाम होतात हे दिसून आले आहे. सर्वसामान्यपणे जमिनीवरील कचऱ्याचेच प्रमाण सागरी कचऱ्यातही अधिक दिसून येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात स्वच्छ भारत अभियानाची मुहूर्तमेढ रोवत हागणदारीमुक्त भारताची हाक दिली. तशाच प्रकारे पंतप्रधान म्हणून आपली दुसरी इनिंग सुरू करताना २०१९मध्ये लाल किल्ल्यावरून राष्ट्राला संबोधित करताना त्यांनी स्वच्छतेशी संबंधित आणखी एका मोठ्या विषयाला हात घातला तो म्हणजे एकल वापराचे प्लास्टिक. ते म्हणाले, पूजनीय बापूजींच्या स्मृत्यर्थ आपण सर्वांनी घराबाहेर पडून एकल वापराचे प्लॅस्टिक गोळा करण्याची मोहीम राबवायला हवी. घरे, रस्ते, चौक, गटारे, नाले अशी सारी ठिकाणे आपण अशा प्लास्टिकपासून मुक्त ठेवायला हवीत. नगरपालिका, नगर परिषदा आणि ग्रामपंचायतींनी असे प्लास्टिक गोळा करण्यासाठी खास मोहीम आखायला हवी.

एवढे सांगून भारताला एकल वापराच्या प्लास्टिकपासून मुक्त करण्यासाठी आपल्याला पहिलं मोठं पाऊल २ ऑक्टोबरला उचलता येईल का, असा प्रश्नही पंतप्रधानांनी आपल्याला विचारला. अशा प्लास्टिकचा पुनर्वापर करण्यासाठी काही करता येईल काय याचा शोध घेण्याचे आवाहन उद्योजक आणि तंत्रज्ञांना करतानाच कापडी तसेच तागाच्या पिशव्या वापरण्याचे आवाहनही त्यांनी लोकांना केले.

२०२२पर्यंत एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर बंद करण्यासाठी पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाच्या अनुशंगाने २०२१च्या १२ ऑगस्टला पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालयाने प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतच्या सुधारित कायद्याची अधिसूचनाही काढली आणि १ जुलैपासून एकल वापराच्या प्लास्टिकपासून बनलेल्या आणि कमी उपयुक्तता व अधिक कचरामुल्य असलेल्या काही वस्तूंचा वापर, उत्पादन, आयात, साठवणूक आणि वितरण यांवर भारतात संपूर्ण बंदी घालण्यात येत असल्याचे २१ जून रोजी जाहीर करण्यात आले.

संयुक्त राष्ट्रांच्या कोस्टल क्लीन सीज मोहिमेतील सहयोगी सदस्य म्हणून ही सारी पावले भारताने उचलणे अपेक्षित होतेच. सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट गोलच्या चौदाव्या मुद्द्याचा पहिलाच भाग सर्व प्रकारच्या सागरी प्रदूषणाला आळा घालणे, विशेषतः किनाऱ्यांवरील क्रियाकलापांतून होणारे प्रदूषण, ज्यांत भरावांमुळे होणारे आणि पोषण घटकांचे प्रदूषण यांचाही समावेश होता. आणि २०२५पर्यंत तो अमलात आणण्याचे भारताने ठरवले आहे. दरवर्षी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी जगभर आंतरराष्ट्रीय सागरी किनापट्टी स्वच्छता दिन साजरा केला जातो. यंदा भारताच्या संपूर्ण किनारपट्टीवर १७ सप्टेंबर रोजी स्थानिक लोक आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून भारत सरकार स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहीम राबविणार आहे. यंदाची ही मोहीम स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाशीही जोडली गेली आहे. या मोहिमेतून सागरी कचऱ्याबाबतच्या वेगवेगळ्या पैलूंवर शास्त्रीय माहितीही गोळा करण्यात येणार आहे. या मोहमेदरम्यान किनारपट्टीवरून १,५०० टन कचरा गोळा करण्याचा संकल्प आहे. तो तडीस गेल्यास सागरी जिवांना आणि किनारी प्रदेशात राहणाऱ्या लोकांनाही तो मोठा दिलासा ठरेल.

पृथ्वी विज्ञान मंत्रालय (एमओइएस), पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालय (एमओइएफसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), भारतीय तटरक्षक दल, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए), सीमा जागरण मंच, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), पर्यावरण संरक्षण गतिविधी (पीएसजी) यासह अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्था या मेहिमेत सहभागी होणार आहेत.

इको मित्रम या नावाचे एक मोबाइल ॲपही या अभियानासंदर्भात जागृती घडवून आणण्याकरिता तसेच या अभियानात स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याकरिता तयार करण्यात आले आहे.

या अभियानाद्वारे प्लास्टिकच्या वापराने आपल्या सागरी जीवांची हानी कशी घडते. याबाबत मोठ्या प्रमाणावर जागृती घडून येईल आणि मोठ्या प्रमाणावर वर्तनबदल झालेला दिसून येईल, असा दृढविश्वास आहे.

**-डॉ. जितेंद्र सिंह,**

लेखक केंद्रीय राज्यमंत्री असून विज्ञान तंत्रज्ञान (स्वतंत्र प्रभार), पृथ्वी विज्ञान (स्वतंत्र प्रभार), पंतप्रधान कार्यालय, कार्मिक, अणुऊर्जा व अवकाश आदी खात्यांचा कार्यभार सांभाळतात.

## निवडक



### विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रा.जी.प.मराठी शाळा वडघर येथील गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. गिरीश गुणे, डॉ. अभय शेट्ये, उदयोगपती व पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी, केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमीत ओझे, शाळा व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, उपाध्यक्षा सोनाली साळुंखे, शिक्षक वर्ग, पालकवर्ग व नागरीक आणी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

### तरुणीची आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात एका तरुणींनी अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल जवळील करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे.आशिका गुरुंग (वय २३) हिने अज्ञात कारणावरून करंजाडे से. ०२ कृष्णा सोलीटर या सोसायटीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### डोलघरमध्ये घरात चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्याने घरात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मिळून एकूण तीन लाख आठ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना तालुक्यातील डोलघर येथे घडली आहे. विश्वनाथ पाटील वय (४६, रा. डोलघर) यांच्या घरात अज्ञात चोरट्याने स्लायडिंगच्या खिडकीतून आत प्रवेश करून बेडरूमधील लाकडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मिळून एकूण तीन लाख आठ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. या बाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** वसई-पनवेल मेमो रेल्वे गाडीची ठोकर लागून खांदा कॉलनीजवळ एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघाताची नोंद पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सेक्टर ७, खांदा कॉलनी येथील हरिओम शिवशंकर गुप्ता (वय ४८) हा रेल्वे ट्रॅक क्रॉस करत असताना त्याला रेल्वेची धडक बसली. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस अधिक तपास करत आहेत.

### खारघरमध्ये मंगळसूत्र पळविले

**पनवेल :** बिल्डिंगच्या कंपाऊंडच्या जिन्यामध्ये महिला चोरट्याने गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने खेचून पळ काढला. खारघर सेक्टर १५ येथील कविता अविनाश पाटील या सुवर्ण गंगा चौक येथे जाण्यासाठी घरातून निघाल्या. या वेळी बिल्डिंगच्या वॉल कंपाऊंडच्या जिन्यामध्ये त्या आल्या असता एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गळ्यातून दोन तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळ काढला. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### काळुंद्रे येथे मुलाची आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरच्या हॉलमध्ये छताला असलेल्या लोखंडी हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल जवळील काळुंद्रे गावात घडली आहे. सुजितकुमार महतो याने अज्ञात कारणावरून राहत्या घरच्या हॉलमध्ये छताला असलेल्या लोखंडी हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबतची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तरुणीच्या हातातून मोबाइल हिसकावला

**पनवेल :** रिक्षाची वाट पाहत असताना एका १८ वर्षीय तरुणीचा मोबाइल मोटरसायकवरून आलेल्या चोरांनी लांबवला व ते पसार झाले. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण शीळ रोड येथील जान्हवी यादवाड ही खारघर (सेक्टर ३६) येथे शिक्षण घेते. कॉलेजहुन सुटल्यानंतर ती घरी जाण्यासाठी निघाली. पनवेल-मुंब्रा रस्त्यावर डोंबिवलीकडे जाणाऱ्या रिक्षाची वाट पाहत ती उभी होती. या वेळी तिने मोबाइलवरून आईला फोन केला. दरम्यान, मोटरसायकल वरून आलेल्या चोराने जान्हवीच्या हातातील मोबाइल हिसकावून घेतला व ते पळून गेले.

# कळंबोलीतील उद्यानांची दुरवस्था

## पे ॲण्ड पार्क बनले मद्यपी व जुगारांचा अड्डा

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर २ व सेक्टर ६ मधील उद्याने डंपिंग ग्राउंड बनली आहेत. गेल्या काही दिवसांपासून कचरा उचलला गेला नसल्याने नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास होत आहे. तेव्हा तो कचरा ताबडतोब उचलण्यात यावा व मद्यपीची बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

कळंबोली सेक्टर २ मधील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले पे ॲण्ड पार्क उद्यान एक वेळ कळंबोली शान वाढवत होते. त्याच्या संरक्षण भिंती गायब आहेत. ते आज लोप पावत आहे.

तर साईनगर वसाहतीजवळ सिडकोचे उदयान असून हे शहरातील महत्त्वाचे उद्यान आहे. उद्यान गर्दुल, मद्यपी, जुगारी आणि भिकारीचे ठिकाण बनले आहे. सेक्टर ६ मधील उद्यानाना काही महिन्यांपूर्वी संरक्षक लोखंडी जाळ्या बसविण्यात आल्या होत्या पण ते काम निकृष्ट दर्जाचे असल्याने त्या जाळ्या तुटुन गेल्या आहेत. त्यामुळे उद्यान लोप पावत चालले आहे. या संपूर्ण उद्यानात गटुळे व मद्यपींचा दररोज अड्डा जमतो. त्यामुळे या ठिकाणी मद्याच्या बाटल्या इतस्ततः विखुरलेल्या दिसून येतात. परिणामी हे उद्यान महिला वर्गाला व ज्येष्ठ नागरिकांना असुरक्षित बनले आहे.

सेक्टर २ मध्ये असलेल्या पाण्याच्या टाकीवर कार्यरत असलेल्या कामगारांसाठी सोयी सुविधा देताना सिडकोने शौचालय उभारण्यात आले आहे. त्याची निगा राखली जात नसल्याने त्यात किडे पडले आहेत येथे.

कायमच दुर्गंधी असते, त्यामुळे कामगारांना नाईलाजास्तव त्याचा वापर करावा लागतो. पण त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

## चौकडीने कार चालकाला लुटले

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावरील घटना

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या कारमध्ये प्रवासी बनून बसलेल्या अज्ञात चौकडीने कार चालकाला मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावर लुटल्याची घटना उघडकीस आली आहे.

खांदेश्वर पोलिसांनी या घटनेतील अज्ञात चौकडीविरोधात जबरी लुटीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

कार चालक स्वप्निल कुदळे (वय २८) पुणे येथून एअरपोर्टचे भाडे घेऊन मुंबईत आला होता. त्यानंतर पुणे येथे जाण्यासाठी निघाला असताना खारघर येथील ब्रिजखाली चौघे लुटारू पुणे- वाकड येथे जाण्याच्या बहाण्याने त्याच्या कारमध्ये बसले. त्यानंतर स्वप्नील मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावर खालापूर येथे पोहोचल्यानंतर एका लुटारूने बहाणा करून कार थांबवायला सांगितली. पाठीमागे बसलेल्या लुटारूने स्वप्नीलचा गळा आवळला, तर दुसऱ्याने त्याचे तोंड दाबून मारहाण केली. तर तिसऱ्याने चाकूचा धाक दाखवून धमकावले. त्यानंतर त्यातील एका लुटारूने कारचा ताबा घेत विरुद्ध दिशेने पुन्हा मुंबईच्या दिशेने पनवेल येथे जाण्यास सुरुवात केली.

यादरम्यान चौघांनी स्वप्नीलच्या गळ्यातील सोन्याची चेन, हातातील अंगठ्या, ब्ल्यूटुथ इयर फोन जबरदस्तीने काढून घेतले. मात्र रोख रक्कम न सापडल्याने स्वप्निलकडील एटीएम कार्ड व त्याचे पासवर्ड जबरदस्तीने घेऊन एटीएम सेंटरमधून १० हजार रुपये काढून घेतले व पलायन केले.

## विदेशात नोकरी देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

विदेशात नोकरी लावण्याच्या बहाण्याने पैसे घेऊन २००हुन अधिकांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे.

प्रत्येकाकडून ८० हजार ते एक लाख रुपये घेऊन तुर्की व इतर देशात नोकरीची हमी देण्यात आली होती. त्यांना विमानाचे तिकीट दिल्यानंतर प्रवासाच्या दोन दिवस अगोदर सर्वांचे तिकीट रद्द करण्यात आल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला. वाशी येथील हावरे फँटसीया मॉलमध्ये कार्यालय थाटून हा प्रकार करण्यात आला आहे. त्याठिकाणी प्राईम इंटरनॅशनल टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे कार्यालय थाटून फसवणूक झाली आहे. याप्रकरणी त्यांनी वाशी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा टास्क फोर्सचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यामध्ये कोविड-१९ मध्ये मृत्यू पावलेल्यांच्या निकटवर्तीयांना तसेच विधवा महिला व अनाथ झालेल्या बालकांना शासन आपल्या दारी या संकल्पने अंतर्गत शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी तसेच त्यांची आरोग्य तपासणी करणेसाठी आजीवली प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये आजीवली, पोयंजे, कोन, कोळखे, काळुंद्रे, सोमटणे, दहिवली, विचुंबे, देवद, बारवई, मोहोपे, पळस्पे, भातानपाडा, भिंगार या गावातील कोविड-१९ मुळे विधवा झालेल्या महीला लाभ घेण्यासाठी उपस्थित होत्या.

या शिबिरामध्ये तालुका विधी सेवा समितीच्या सर्व सेवा, संजय गांधी निराधार योजना, बँक ऑफ इंडिया मुद्रा कर्जाबाबतची माहिती, आदिवासी विभागाच्या योजना, बालसंगोपन योजना, विधवा प्रमाणपत्र, बचत गट स्थापन करणेबाबत माहिती, कृषी विभागाच्या योजना, पोस्ट ऑफिस संबंधीत योजना, वजीर फाउंडेशन मार्फत मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण आदि योजनांची माहिती संबधीत विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत सविस्तरपणे देण्यात येवून योजनेसंबंधीत कागदपत्रांची पुर्तता करुन घेण्यात आली. यापुढेही प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय शिबीर आपटा, गव्हाण, वावंजे, नेरे आदि ठिकाणी लवकरात लवकर आयोजित करण्यात येतील, असे प्रतिपादन तहसीलदार विजय तळेकर यांनी केले.

या वेळी वात्सल्य समितीचे सचिव चेतन गायकवाड, वैद्यकिय अधिकारी प्रभाकर पाटील, ग्राम स्वराज्य समिती अध्यक्ष अल्लाउद्दिन शेख, ग्राम स्वराज्य समिती सदस्य संतोष ठाकूर, जिल्हा विधी सेवा समिती प्रतिनिधी शैलेश कोंडस्कर, ॲड. अस्मिता भुवड, युवा संस्था पनवेलचे चेतन वाघ, बाळकृष्ण नारायण पाटील, विस्तार अधिकारी वैशाली वैद, वनिता वाघ, कार्तिकी मोकाशी, संगिता भगत, वंदना गोंडाणे, ए.बा. वि.से.यो. प्रकल्प पर्यवेक्षिका पुजा चांगोले, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आजीवली येथील विस्तार अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, एएनएम, एमपीडब्लू व कर्मचारी उपस्थित होते.



## सागरी किनारी सुरक्षा जागरूकता अभियान

**पनवेल, उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

भारतीय नौदलाच्या पथकाकडून प्रत्येक जिल्ह्याच्या अंतर्गत असलेल्या विविध मासेमारी गावांमध्ये सागरी किनारी भागातील गावांमध्ये सागरी पोलीस ठाणे किनारी भागात सुरक्षा जागरूकता आणि डेटा संकलन मोहीम राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने उरण सागरी पोलीस ठाणे हद्दीत उरणमधील करंजा मच्छीमार सोसायटी येथे भारतीय नौदलाचे पथकातर्फे मोहीम राबवण्यात आली.

या वेळी मच्छिमार बांधवांनी मासेमारीकरिता खोल समुद्रात मासेमारीकरिता जाताना व्हीएचएफ वायरलेस सेट, मोबाइल फोन सोबत घेऊन जाणे, बोटींमध्ये सुरक्षेकरिता जीव रक्षक साधन सामुग्री जवळ बाळगणे व मासेमारी करिता जे मार्ग देण्यात आलेले आहेत त्याच मार्गाचा वापर करण्यात यावा, तसेच मासेमारी करीत असताना नियमितपणे बोटींची मुळ कागदपत्रे व बोटीवर असलेल्या प्रत्येकाकडे फोटो आयडी कार्ड जवळ बाळगणे, समुद्रात कोणत्याही प्रकारची अनोळखी बोट आढळून आल्यास तत्काळ दूरध्वनी क्रमांक २२७५१०२६ अथवा १०२२ अथवा १०३१वर तसेच एमआरसीसी. टोल फ्री क्र. १५५४, ओएनजीसी हेल्पलाईन १८००२२१९५६ वर संपर्क करणे याबाबत सूचना देण्यात आल्या.

अभियानामध्ये भारतीय नौदलाचे लेफ्टनंट कमांडर डेविड सिंह, कोस्टगार्ड प्रधान अधिकारी पी. एम. सतदेव, ओएनजीसीचे सुरक्षा निरीक्षक अधिकारी स्वनिल ठाकुर व सुनिल कुमार, सागरी सुरक्षा शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत धरणे, उरण सागरी पोलीस ठाणे, सहाय्यक निरीक्षक विशाल राजवाडे, सागरी सुरक्षा शाखा, नौका विभाग, साईनाथ दळावी, बंदर विभागाचे, पोलीस निरीक्षक, देविदास जाधव, करंजा मासेमारी सोसायटी अध्यक्ष भालचंद्र कोळी व सागरी किनारी गावातील ११० सागर रक्षक दल सदस्य, मच्छीमार बांधव उपस्थित होते.

## उरण महाविद्यालयात चलन व्यापारावर कार्यशाळा


**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने परकीय चलन विनीमय व्यापारफया विषयावर पुणे येथील नॉलेज ट्रेड अकॅडमी यांच्या सहकार्याने महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित केली होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत सुशांत शिवदास यांनी ईक्वीटी मार्केट, कमोडीटी मार्केट, फोरेक्स मार्केट आदी विषयी माहिती सांगून फॉरेक्स मार्केट म्हणजे काय? ते कशा पद्धतीने चालते व त्यात आपण कशी गुंतवणूक करावी याविषयी सविस्तर मागदर्शन केले. या वेळी आशिष कांबळे यांनी, विद्यार्थ्यांनी अपडेटबरोबर अपग्रेड राहिले पाहिजे, तसेच आत्मविश्वासाने डिजीटल मार्केटमध्ये उतरले पाहिजे, असे सांगितले.

प्रशिक्षक कांचन मॅडम यांनी विदयार्थ्यांना उत्साही जगण्याचा मार्ग सांगितला. कार्यशाळेसाठी नॉलेज ट्रेड अकॅडमीचे संचालक राजकुमार कांबळे, ज्येष्ठ प्रा. व्हि. एस. इंदुलकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत व परिचय प्रा.डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी व्यक्त केले.





## गव्हाण विद्यालयाच्या उपक्रमांमुळे पंचक्रोशी देशभक्तीने ओथंबली

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विविध उपक्रमांची रेलचेल चालू आहे. देशभक्तीपर उपक्रमांनी गव्हाण पंचक्रोशी देशभक्तीने ओथंबल्याचे चित्र दिसत आहे.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात येत आहेत.



गव्हाण कोपर गावातून विद्यार्थ्यांनी गुरुवारी (दि. ४) जनजागृती फेरी काढून हर घर तिरंगा, हर दिल तिरंगा, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा विजय असो, भारत माता की जय अशा विविध घोषणांनी ढोल-ताशांच्या गजरात परिसर दणाणून सोडला.

गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजयशेठ घरत व रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते तिरंगा ध्वज उंचावून जनजागृती फेरीचे प्रस्थान झाले. जनजागृती फेरीची सांगता पुन्हा विद्यालयाच्या मैदानावर झाली. या वेळी प्राचार्या साधना डोईफोडे, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, प्रसन्न ठाकूर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे अन्य शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या पालकांसाठीही सोमवारी (दि. ८) वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर यांनी दिली.

# हर घर तिरंगा अभियानासाठी पोलादपूर सज्ज

## विविध उपक्रम राबविण्यात येणार : तहसीलदार देसाई

**पोलादपूर : प्रतिनिधी**

संपूर्ण देशभर स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत असताना पोलादपूर तालुक्यातील गावागावांत यासाठी जय्यत तयारी केली जावी यासाठी पोलादपूर तहसील कार्यालयामार्फत प्रयत्न सुरू झाले आहेत. ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे ग्रामसेवक आणि मावळते सरपंच व सदस्य यांच्या माध्यमातून तिरंगा झेंडा वितरीत करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे या वेळी तहसिलदार दिप्ती देसाई यांनी सांगितले.



पोलादपूर तालुक्यात एकीकडे अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट हवामानखात्याच्या माध्यमातून जारी झाल्याने प्रशासनाकडून आपत्तीनिवारणकामी विशेष सतर्कता बाळगली जात आहे. दुसरीकडे, देशाच्या स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करताना कोणत्याही स्वरूपाचा निरूत्साह जाणविण्याची परिस्थिती दिसून येणार नाही, याची दक्षतादेखील प्रशासन घेत असल्याचे यावेळी तहसीलदार दिप्ती देसाई यांनी सांगितले.

पोलादपूर तालुक्यामध्ये दि. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान घरोघरी तिरंगा अभियान वातावरणामध्ये चैतन्यनिर्मिती करणारे आणि उत्साही ठरणार आहे. तालुक्यातील नागरिकांना तिरंगा झेंड्याची विक्री सुरू झाली असल्याचेही या वेळी तहसिलदार दिप्ती देसाई यांनी बोलताना सांगितले.

# खोपोलीत ट्रक दरीत कोसळला

**खालापूर : प्रतिनिधी**

पुणे बाजूकडून खोपोलीकडे सिमेंटवाहक ट्रक ३० फूट खोल दरीत कोसळला. या ट्रकमध्ये ४० टन सिमेंट होते. ट्रक उलटल्याने पूर्ण लोड केबिनवर आल्याने चालक केबीनमध्ये अडकला होता. चालकाला वाचविण्यासाठी मदतकार्य करणाऱ्या सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांना अडचण येत होती. शर्थीच्या प्रयत्नाने चालकाला बाहेर काढण्यात यश आले.

जखमी अवस्थेतून चालकाला ३० फूट खोल दरीतून बाहेर काढीत या चालकाला पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी रवाना करण्यात आले. ही घटना बोरघाटातील



खोपोली बायपास मार्गावर मुळगांव ठाकूरवाडी हद्दीत सकाळी ७ वा. च्या सुमारास घडली. अतुल विश्वनाथ शिंदे ४० असे चालकाचे नाव आहे.

# रोहा तालुक्यात मुसळधार पाऊस

## भुवनेश्वर येथे घराची भिंत कोसळली; जनजीवन विस्कळीत

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात गेली तीन दिवस मुसळधार पाऊस पडत असल्याने सखल भागात पाणी साचले आहे. सर्वत्र पाणीच पाणी हे दृश्य दिसत असून पावसाने शहरासह ग्रामीण भागात झोडपून काढले आहे. दरम्यान भुवनेश्वर येथील घराची भिंत कोसळली.



रोहा तालुक्यात यावर्षी पावसाने सुरूवात उशिरा केल्याने शेतकरी धास्तवला होता. जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलै महिन्यात पावसाने जोर धरला.त्यामुळे तालुक्यात भातशेतीसह अन्य शेतीच्या कामाला वेग येत लावणी पूर्णात्वास गेली. जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाचा वेग मंदावला होता.अखेर ऑगस्टच्या पाच तारखेला मुसळधार पावसाने हजेरी लावली ती सलग तीन दिवस रोह्यात मुसळधार पाऊस पडत आहे.त्यामुळे काही प्रमाणात रोह्यात जनजीवन विस्कळित झाल्याचे दिसून आले.

रोहा तालुक्यात शुक्रवारी दुपारी पावसाने सुरूवात केल्यानंतर शनिवारी, रविवारी पाऊस मुसळधार पडत होता. शुक्रवारी दुपारी आलेल्या मुसळधार पावसामुळे शहरासह ग्रामीण भागात सखल भागात पाणी साचले होते. दरम्यान, भुवनेश्वर येथील घराची भिंत कोसळली असून यात दोन घरांचे नुकसान झाले आहे. गेले दोन दिवस पाऊस सातत्याने पडत असल्याने हवेत गारवा वाढला आहे.

# माणगावमध्ये न.प.कडून जनजागृती रॅली

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वातंत्र्यदिनी घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येणार आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी माणगाव नगरपंचायतीकडून शनिवारी (दि. ६) सकाळी भव्य रॅली काढण्यात आली होती.

माणगाव नगरपंचायत कार्यालयापासून काढलेल्या या रॅलीत भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणा देत अमृत महोत्सवी वर्षाचा जयघोष करण्यात आला. यानंतर मुंबई-गोवा महामार्ग, शेलार नाका ते बालाजी कॉम्प्लेक्स अशी रॅली काढण्यात आली. या रॅलीत लोकप्रतिनिधी, नगरपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अभियानानिमित्त सगळीकडे उत्साह आहे.



# स्वातंत्र्याची अमृतमहोत्सवी दौड आज माणगावला

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माणगाव पोलीस ठाण्यातर्फे सोमवारी (दि. ८) सकाळी ७.३०वाजता प्रांत कार्यालयासमोर स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी दौडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दौडमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील व माणगावचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी केले आहे.

# किहीम समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

## दोन टन कचरा केला गोळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या सूचनेनुसार देशभर विविध उपक्रम राबविले जात आहेत. रायगड जिल्ह्यातदेखील घरोघरी तिरंगा आणि सागर स्वच्छता अभियान राबविले जात आहे. या अंतर्गत अलिबाग तालुक्यातील किहीम येथील समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालय अलिबाग, तहसील कार्यालय अलिबागचे कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे



प्रतिनिधी, शालेय विद्यार्थी तसेच ग्रामस्थ यांनी या मोहीमेत सहभाग घेतला. तहसीलदार मीनल दळवी यांनी या मोहीमेचे नेतृत्व केले. यावेळी नायब तहसिलदार अजित टोळकर, मानसी पाटील किहीम ग्रामपंचायतीचे सदस्य, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी वडके हायस्कूलचे विद्यार्थी, माणुसकी प्रतिष्ठान, लाइफ फाउंडेशन, लायन्स क्लब, जयहिंद फाउंडेशन, रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते. या वेळी सुमारे दोन टन कचरा गोळा करण्यात आला.

# बस फेऱ्या सुरु न झाल्याने विद्यार्थ्यांना फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शाळा महाविद्यालये सुरु होऊन दोन महिने संपत आले आहेत. तरीदेखील जिल्ह्यातील गाव पातळीवरील शाळांच्या फेऱ्या सुरु करण्याबाबत एसटी महामंडळ उदासीन आहे. त्याचा आर्थिक भुर्दंड विद्यार्थी आणि पालकांना बसतो आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी एसटी हा सर्वात जवळचा आणि स्वस्त पर्याय आहे. जिल्ह्यामध्ये १३ जूनपासून शाळा सुरु झाल्या. त्यानंतर महाविद्यालयीन वर्गदेखील सुरु करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शाळांमध्ये जाण्याची लगबग वाढली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागाने काही एसटी बस फेऱ्या सुरु केल्या आहेत. मात्र या एसटी बस फेऱ्यांचा गावे, वाड्यांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना काहीच फायदा होत नाही. गावातील शाळेच्या फेऱ्या अद्यापर्यंत एसटी महामंडळाने सुरु न केल्याने विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयात येण्यासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना अधिक पैसे मोजून प्रवास करणे शक्य होत नाही. एसटी महामंडळाच्या या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. यासंदर्भात प्रवाशांसह पालक वर्गांकडून एसटी बसमधील आगार प्रमुखांशी चर्चा झाली आहे. मात्र जिल्ह्यातील काही आगार व्यवस्थापकांकडून आधी एसटी बसचा पास काढा, नंतर एसटी फेऱ्या सुरु करू असे सांगून वेळकाढूपणा केला जात आहे. जिल्ह्यातील काही आगार व्यवस्थापकांच्या या मनमानी कारभाराचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसत आहे. गावांतील शालेय फेऱ्या सुरु करा अशी मागणी पालक वर्गांकडून जोर धरत आहे. मात्र या मागणीला केराची टोपली दाखविण्याचे काम प्रशासनाकडून केले जात आहे.

> **शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्ह्यातील आगार व्यवस्थापकांना शालेय एसटी फेऱ्या सुरु करण्याच्या सूचना केल्या आहेत. आतापर्यंत ९५ टक्के फेऱ्या सुरु आहेत. उर्वरित राहिलेल्या फेऱ्या सुरु करण्याबाबत सांगण्यात येईल.**
>
> **-अनघा बारटक्के, वाहतूक नियंत्रक रायगड विभाग**

# रायगड जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयात मागील दोन दिवसांपासून चांगला पाऊस बरसतो आहे. रायगड जिल्ह्याला रविवारी (दि. ७) व सोमवारी ( दि. ८) असा ४८ तासांचा रेड अलर्ट दिला आहे.

जुलैच्या मध्यानंतर पाऊस चांगलाच बरसला. जूनमधील सरासरीची कसर भरून काढली. त्यामुळे लावणीची कामेही वेगात सुरू झाली. मात्र अखेरच्या टप्प्यात पुन्हा पावसाने पाठ फिरविली. मागील आठ ते १० दिवसांपासून जिल्ह्याच्या सर्वच भागात कडक ऊन पडत होते. त्यामुळे नागरीक चांगलेच हैराण झाले होते. लावणीची कामे अंतिम टप्प्यात असतानाच पावसाने ओढ दिल्यामुळे बळीराजादेखील चिंताग्रस्त झाला होता. मागील दोन दिवसांपासून पाऊस बरसत आहे. दक्षिण रायगडातील महाड , पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, माणगाव या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असून उत्तरेत अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत.

# रायगड जिल्ह्यात वॉटरफॉल रॅपलिंगचा रोमांचकारी थरार

**पाली : धम्मशील सावंत**




पावसाळ्यात प्रामुख्याने धबधबे, धरणे, गडकिल्ले व निसर्गाच्या सानिध्यात फिरण्यासाठी गर्दी होते. मात्र याबरोबरच जिल्ह्यात वॉटरफॉल रॅपलिंग या अडव्हेंचर खेळाचा रोमांचकारी, रोमहर्षक थरार व मौज अनुभवण्यासाठी लोक पसंती देताना दिसत आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुंबई व पुणे येथील तरुण व तरुणींचा सहभाग व उत्साह अधिक पाहायला मिळत आहे.

जिल्ह्यात भिरा येथील देवकुंड, पनवेल जवळील धोदानी धबधबा, अलिबाग तालुक्यातील सागरगड येथील धबधबा, कर्जत तालुक्यातील डिकसळ व भिवपुरी येथील बेकरे या धबधब्यांवर वॉटरफॉल रॅपलिंगसाठी गर्दी असते. विविध संस्था येथे वॉटरफॉल रॅपलिंगचे आयोजन करतात. त्यामुळे स्थानिकांना चांगला रोजगारदेखील उपलब्ध होत आहे. सुधागड तालुक्यातील आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक व मॅकविला द जंगल यार्डचे संस्थापक मॅकमोहन हुले यांनी सांगितले की, पनवेल येथील धोदानी धबधब्यावर प्रत्येक विकेंडला रॅपलिंगचे आयोजन सुरू करण्यात येत आहे. मागील आठवड्यात एस. एन. डी. टी कॉलेजच्या ४० विद्यार्थिनींनी वॉटरफॉल रॅपलिंगचा थरार व मस्ती अनुभवली आहे. रॅपेलिंग हा एक गिर्यारोहणाचाच प्रकार असून उत्कृष्ट साहसी खेळ आहे. यात कोणीही करू शकणाऱ्या चढाई व उतरणे या क्रियेचा समावेश आहे. यात फार कमी वेळात लोक खाली उतरू शकतात.

## युवक युवतींचा सहभाग, उत्साह

वॉटरफॉल रॅपलिंगमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सदृढ राहण्यास मदत होते. शिवाय थरार व मजादेखील सुरक्षितपणे अनुभवता येते. त्यामुळे दिवसेंदिवस रॅपलिंगला अधिक पसंती मिळताना दिसत आहे. जिल्ह्यात यासाठी उत्कृष्ट व सुरक्षित ठिकाणेदेखील आहेत. परिणामी पुणे, मुंबई आदी शहरातील तरुण व तरुणी



तसेच लहानगे मोठ्या प्रमाणात रॅपलिंगचा आनंद व थरार अनुभवण्यासाठी येथे येताना दिसत आहेत. दरम्यान, रॅपलिंगचा व्यावहारिक आणि स्पर्धात्मक दोन्ही उपयोग व फायदा आहे. व्यावहारिकतेमध्ये जेव्हा एखादी व्यक्ती (सेल्फ रेस्क्यू) किंवा इतर व्यक्तींना उंचीवरून सुरक्षितपणे खाली उतरण्याची (रेस्क्यू) आवश्यकता असते त्यावेळी रॅपलिंगचा खूप फायदा होतो.

तसेच स्पर्धात्मक रहाणे ही माणसाला तितकीच नवीन आव्हाने देतात. अनुभवसुद्धा तितकाच दांडगा होतो. चिकट झालेला तीव्र उताराचा धबधब्याचा कातळ, त्यावरून कोसळणारे धबधब्याचे जोरदार पाणी आणि यावर दोरीच्या सहाय्याने धबधब्याच्या टोकावर जाणे व खाली येणे हे सर्व अतिशय रोमांचकारी आणि संपूर्ण शरीरात तीव्र अद्भूत चेतना जगविणारे आहे.

> **अनेक लोक पावसाळ्यात वॉटरफॉल रॅपलिंग या इव्हेंटसाठी जिल्ह्यात येत असतात. त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम आम्ही करत आहोत. मॅक विला द जंगल यार्ड ही टीम मागील ८ वर्ष वॉटरफॉल रॅपलिंग, कॅम्पिंग-ॲडवेंचर, ट्रेकिंग, सर्च अँड रेस्क्यू, स्कूल इव्हेंट, कॉर्पोरेट इव्हेंट अशा क्षेत्रात काम करत आहे. रायगड जिल्ह्यात यासाठी अधिक वाव व पसंती आहे.**
>
> **-मॅकमोहन हुले, प्रशिक्षक व संस्थापक मॅक विला द जंगल यार्ड**

> **नुकताच पनवेल येथील धोदानी धबधब्यावर रॅपलिंगचा अनुभव घेतला. हा माझ्या आयुष्यातील आजवरचा सर्वोत्तम अनुभव होता. आम्हाला येथील स्वयंसेवकांनी खूप चांगले मार्गदर्शन केले. यापुढे इतरही जणांना सोबत घेऊन पुन्हा रॅपलिंगसाठी यायचे आहे.**
>
> **- वंशिका बोराटे, विद्यार्थिनी**

> **मॅकविला द जंगल यार्ड वॉटरफॉल रॅपलिंग इव्हेंट हा माझ्या आयुष्यातील सर्वात थरारक, आकर्षक, उत्साही, जबरदस्त व मंत्रमुग्ध करणारा अनुभव होता. सर्व प्रशिक्षक विशेषतः मॅकमोहन हे प्रेरणादायी आणि सहकार्य करणारे होते. त्यांनी माझ्या गटातील कोणत्याही सदस्यांना कधीही भीती वाटू दिली नाही. मी आणि माझ्या गटातील सदस्यांना रॅपलिंगची वारंवार पुनरावृत्ती करायची आहे.**
>
> **-प्रतिमा तिवारी, सहल आयोजक, एसएनडीटी महाविद्यालय**

# पोलादपूरच्या रयत विद्यामंदिरमध्ये पथनाट्यातून व्यसनमुक्तीवर जनजागृती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिर पोलादपूरमध्ये शनिवारी (दि. ६) व्यसनमुक्तीसंदर्भात पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी संस्थेचे स्थानिक शाळा सभापती निवास शेठ तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकवर्ग आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनी आणि विद्यार्थी यांनी या पथनाट्यापासून बोध घेतला.

देशात व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे युवा शक्तीचा ऱ्हास होत आहे. यामुळे व्यसनाला आळा घालणे, हे राज्याचे सामाजिक दायित्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या व्यसनमुक्ती धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तसेच नशायुक्त औषधे व अन्य नशायुक्त पदार्थ सेवनापासून समाज दूर राहावा याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि नमू डायनॅमिक आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्य सादरीकरणाचे अभियान राबविले आहे.

यावेळी पथनाट्य कलावंत संकेत धनावडे, स्वप्नील धनावडे, तन्मय राऊत, श्रेयस माईन, तन्वी शिंदे, ऋतुजा पाठक यांनी व्यसनमुक्तीबाबतचे पथनाट्य रयत विद्यामंदिर पोलादपूरच्या प्रांगणात सादर केले. यानंतर महाड येथील एस.टी.आगारात आणि त्यानंतर ऐतिहासिक चवदारतळे येथे या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

नमू डायनॅमिक आर्ट संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर आंगणे आणि त्यांचे सहकारी संदीप सावंत, रवी लोहार, राजू मोरे, अनंत अंकुश, आर्यन देसाई, रामदास तांबे, सुनील देवळेकर, संजय चाचे व दिलीप परळकर आणि मुंबई रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील पथनाटय सादर करणारे ४० कलावंत मिळून कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयामधील ५१ तालुक्यामध्ये व्यसनमुक्ती अभियान राबविण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत.



# सापाला मिळाले जीवनदान

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील संजिवनी डायलेसिस सेंटरच्या मागे सर एस. ए. हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक प्रकाश मसाला यांचे घर व बागायत जमीन आहे. घराच्या मागे असणाऱ्या विहिरीवर झाडांचा पालापाचोळा पडू नये म्हणून त्यांनी जाळी विहिरीच्यावर टाकली होती. या जाळीत साप अडकला.

धामण जातीचा सहा फूट पेक्षा लांबी असणारा धामण जातीचा हा साप फिरत फिरत या जाळीमध्ये अडकला. या सापाचे तोंड जाळ्यात अडकले तर उर्वरित भाग विहिरीच्या लगत लोंबकळत होता. साप खूप पर्यंत करीत होता परंतु त्याची सुटका होऊ शकली नाही. ही घटना लक्षात येताच तत्काळ सर्पमित्र संदीप घरत यांना बोलाविण्यात आले. त्यांनी जाळी कापून या सापाला सुखरूप सोडविले.



मुरुड वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली या सापाला सुखरूप जंगलात सोडण्यात आले आहे. दरम्यान, पावसामुळे साप बाहेर येऊ लागले आहेत.

# टी-२० मालिकेत भारताचे वर्चस्व

## विंडीजचा मोठ्या फरकाने पराभव

**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडीज दरम्यान पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील चौथा सामना फ्लोरिडातील लॉडरहिलमधील सेंट्रल ब्रॉवर्ड रीजनल पार्क स्टेडियम टर्फ ग्राउंडवर झाला. या सामन्यात भारताने वेस्ट इंडीजचा ५९ धावांच्या फरकाने पराभव केला. यापूर्वी, भारताने मालिकेतील पहिला आणि तिसरा सामनाही जिंकला होता त्यामुळे भारताने आता ३-१ अशी विजयी आघाडी घेतली.

भारताने वेस्ट इंडीजला विजयासाठी १९२ धावांचे लक्ष्य दिले होते, मात्र भारतीय गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्यापुढे यजमान संघ १९.१ षटकांमध्येच गुंडाळला गेला. विंडीज संघाला १३२ धावांपर्यंतच मजल मारता आली. लक्ष्याचा पाठलाग



करण्यासाठी उतरलेल्या वेस्ट इंडीजची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. ८२ धावांपर्यंत त्यांचा अर्धा संघ तंबूत परतला होता. वेस्ट इंडीजच्या वतीने कर्णधार निकोलस पूरन आणि रोव्हमन पॉवेल यांनी सर्वाधिक २४-२४ धावा केल्या. भारताच्या अर्शदीप सिंगने तीन बळी घेतले. तर, आवेश खान, अक्षर पटेल आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी दोन-दोन बळी घेतले.

त्यापूर्वी वेस्ट इंडीजचा कर्णधार निकोलस पूरनने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. भारतीय संघाने निर्धारित २० षटकांत पाच गडी गमावून १९१ धावा केल्या होत्या. ऋषभ पंतने ३१ चेंडूत सर्वाधिक ४४ धावा केल्या. याशिवाय कर्णधार रोहित शर्माने ३३, संजू सॅमसन नाबाद ३०, सूर्यकुमार यादवने २४ आणि दीपक हुडाने २१ धावांचे योगदान दिले. अक्षर पटेलने २० धावा करून नाबाद राहिला. वेस्ट इंडीजच्या अल्झारी जोसेफने चार षटकांत २९ धावा देत दोन गडी बाद केले, तर ओबेड मॅकॉयनेही दोन गडी बाद केले.

# ऐरोलीतील बॅडमिंटन स्पर्धेला प्रतिसाद; विविध गटात ४८७ स्पर्धकांचा सहभाग



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम विभागाच्या वतीने 'अमृत महोत्सव बॅडमिंटन स्पर्धे चे आयोजन ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन यांचे सहयोगाने ३ ते ५ ऑगस्ट दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध गटात ४८७ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचा शुभारंभ बुधवारी (दि. ३) उपायुक्त मनोजकुमार महाले यांच्या हस्ते व ऐरोली विभाग अधिकारी महेंद्र सप्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, अभिलाषा म्हात्रे, ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव डॉ. हेमंत अनार्थे व विश्वस्त प्रविण पैठणकर, स्पोर्ट्स कमिटी प्रमुखांच्या उपस्थितीत झाला.

स्पर्धेत ११ वर्षांखालील मुले प्रथम रेवंत शृंगारपुरे, द्वितीय आरव महेश्वर, तृतीय पुर्वन कतक, चतुर्थ ज्ञानेश पाटील तसेच मुलींमध्ये प्रथम अक्षरा जाधव, द्वितीय गीत नखरे, तृतीय तनया औटी, चतुर्थ रक्षा राठोड सन्मानित करण्यात आले.

१३ वर्षांखालील मुले प्रथम मयुरेश भुतकी, द्वितीय शौर्य कौशिक, तृतीय वेदांग मिश्रा, चतुर्थ अभय बिस्ट आणि मुली प्रथम श्वेतलाना मुखर्जी, द्वितीय आर्या अय्यर, तृतीय प्राक्षी जैन, चतुर्थ तिशा श्रीवास्तव, १५ वर्षांखालील मुले प्रथम रुजल वदाते, द्वितीय वितरग शुक्ला, तृतीय अर्णव पाटील, चतुर्थ तनुश अढव आणि मुली प्रथम मनस्वी गौडा, द्वितीय ज्वोहाना सिबी, तृतीय आशिता रॉय, चतुर्थ रेहा शहा यांचेही पारितोषिके प्रदान करून कौतुक करण्यात आले.

खुल्या गटामध्ये महिला प्रथम अलका करायली, द्वितीय मृदुला डाके, तृतीय बितीका रॉय, चतुर्थ नंदिनी शर्मा तसेच पुरुष प्रथम जिन्नांश जैन, द्वितीय सौरव साळवी, तृतीय अर्णव भोसले, चतुर्थ संदिप पाटील या विजेत्या स्पर्धकांना गौरविण्यात आले.


विजयी खेळाडूंना क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व अभिलाषा म्हात्रे तसेच ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संजय डोके, सचिव डॉ. हेमंत अनार्थे, सहसचिव तथा स्पोर्ट्स कमिटी प्रमुख प्रविण पैठणकर, कमिटी सदस्य अनंता कामत, जगदिश नायक, मोहन शेट्टी, मोहन सोमवंशी, अनुराग श्रीवास्तव, शिवा यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# पॅरा टेबल टेनिसमध्ये भारताला सुवर्णपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

कुस्तीत तीन सुवर्णपदके मिळवल्यानंतर भारताची दिग्गज पॅरा टेबल टेनिसपटू भाविना पटेलने आणखी एक गोल्ड मेडल जिंकून दिले आहे. तिने पॅरा टेबल टेनिसच्या महिला एकेरीत (वर्ग ३-५) हे पदक मिळवले आहे. यांसह पॅरा टेबल टेनिसमध्येच भारताच्या सोनलबेन पटेलने कांस्यपदक मिळवले आहे.

भाविनाने फायनलमध्ये नायजेरियाच्या टेनिसपटूला तीन सेट्समध्ये मात देत सामना जिंकला. याआधी भाविनाने उपांत्य फेरीच्या सामन्यात इंग्लंडच्या सू बेलीचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळवत पदक निश्चित केले होते. त्याचवेळी, याशिवाय भारताच्या सोनल बेन पटेलने २०२२च्या राष्ट्रकुल क्रीडा



स्पर्धेत पॅरा टेबल टेनिसमध्ये कांस्यपदक जिंकले. तिने ब्राँझपदकाचा सामना ३-५ने जिंकला. आत्तापर्यंत भारताने ३८ पदके जिंकली आहेत. ज्यामध्ये १३ सुवर्णपदकांचा समावेश आहे.

भाविना पटेल सर्वात आधी २०११च्या थायलंड टेबल टेनिस चॅम्पियनशिपमधून प्रकाशझोतात आली. मागील वर्षी टोक्यो पॅरालिम्पिकमध्येही तिने कमाल कामगिरी करत थेट रौप्यपदक मिळवले. हे तिच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचे सर्वात मोठे यश होते.

# भारताच्या 'ब' संघाचा अमेरिकेला धक्का

**चेन्नई : वृत्तसंस्था**

युवा ग्रँडमास्टर डी. गुकेशच्या सलग आठव्या विजयाच्या बळावर खुल्या विभागातील भारताच्या ब संघाने शनिवारी (दि. ६) बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या आठव्या फेरीत अग्रमानांकित अमेरिकेला ३-१ असा पराभवाचा धक्का दिला.

भारत ब संघाकडून पहिल्या पटावरील गुकेशने जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या फॅबिआनो कारूआनाला ४५ चालींमध्ये पराभूत केले. नागपूरच्या रौनक साधवानीने लिनिएर डोमिंगेजवर ४५ चालींमध्ये मात केली, तसेच निहाल सरिन आणि आर. प्रज्ञानंद यांनी अनुक्रमे लेव्हॉन अरोनियन आणि वेस्ली सो यांना बरोबरीत रोखत भारत ब संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.



याच विभागातील दुसऱ्या मानांकित भारताच्या अ संघाने अर्मेनियाकडून १.५-२.५ अशा फरकाने हार पत्करली. पहिल्या पटावरील पी. हरिकृष्णाला गॅब्रिएल सर्गिसियनने चुरशीच्या लढतीत १०२ चालींमध्ये नमवले. विदित गुजराथी, अर्जुन इरिगेसी आणि एसएल नारायणन यांचे सामने बरोबरीत सुटल्याने भारताच्या अ संघाचा पराभव झाला. भारताच्या क संघाला पेरूने १-३ असे पराभूत केले.

महिला विभागात भारताच्या अ संघाला युक्रेनने २-२ असे बरोबरीत रोखले. कोनेरू हम्पी, द्रोणावल्ली हरिका, आर. वैशाली आणि तानिया सचदेव या चौघींचेही सामने बरोबरीत संपले. भारताच्या ब संघाने क्रोएशियावर ३.५-०.५ अशी मात केली. त्यांच्याकडून वंतिका अगरवाल, पद्मिनी राऊत आणि दिव्या देशमुख यांनी आपापले सामने जिंकले. भारताच्या क संघाने मात्र पोलंडकडून १-३ असा पराभव पत्करला.

# अविनाश साबळेने मानले पंतप्रधानांचे आभार

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम २०२२ कॉमनवेल्थ गेम्समध्ये पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेत महाराष्ट्राच्या अविनाश साबळेने रौप्य पदक जिंकले आहे. या विजनानंतर अविनाशने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या प्रेरणेमुळेच मी हे यश मिळवू शकलो असल्याची भावना व्यक्त केली आहे.

कॉमनवेल्थ २०२२ गेम्समध्ये पुरुषांच्या तीन मीटर स्टीपलचेस स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी अविनाश साबळे यांचे अभिनंदन केले. यासोबतच मोदी यांनी अविनाश साबळे यांच्याशी झालेल्या संभाषणाचा व्हिडिओही शेअर केला आहे. यानंतर अविनाश साबळेने, पंतप्रधान मोदींनी इथे येण्याअगोदर सर्व खेळाडूंशी संवाद साधून आम्हाला प्रोत्साहित केले. टोकियो ऑलंपिकमध्ये भारतीय खेळाडूंना चमकदार कामगिरी करता आली नव्हती. याची खंत मनात होतीच. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मी रौप्य पदक जिंकले असले तरी पुढच्या वेळेस मी सुवर्णपदक जिंकण्याचा प्रयत्न करणार असल्याचे म्हणाला.

# उलवे नोड येथे आमदार चषक फुटबॉल स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि पनवेल फुटबॉल क्लबच्या संयुक्त विद्यमाने आमदार चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स एमडी तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) झाले, तसेच या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

ही एकदिवसीय फुटबॉल स्पर्धा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत नवी मुंबई आणि पनवेल तालुक्यातील १६ संघांनी सहभाग घेतला आहे. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, अमोघ ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, खेळाडू आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# अविनाश, प्रियंका यांची रौप्यपदकांची कमाई

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राचा अविनाश साबळे आणि प्रियंका गोस्वामी यांनी भारताच्या रौप्यपदकांमध्ये भर घातली. अविनाशने तीन हजार मीटर स्टिपलचेस प्रकारात, तर प्रियंकाने १० हजार मीटर चालण्याच्या शर्यतीत दुसरा क्रमांक मिळवला.

अविनाश आणि अब्राहम किबीवोट यांच्यात अखेरच्या टप्प्यापर्यंत कमालीची चुरस होती. केनियाच्या दोन धावपटूंना मागे टाकून अविनाशने किबीवोटला गाठले होते. अखेरच्या १००



मीटर अंतरावर मात्र किबीओटने वेग घेत साबळेला मागे टाकले. केवळ दशांश पाच सेकंदाच्या फरकाने अविनाशचे सुवर्णपदक हुकले. किबीवोटने आठ मिनिटे, ११.१५ सेकंद, तर अविनाशने आठ मिनिटे, ११.२० सेकंद अशी वेळ नोंदवली. अविनाशच्या रौप्यपदकाने केनियाच्या वर्चस्वाला शह बसला. राष्ट्रकुल स्पर्धेत तीन हजार मीटर स्टिपलचेस शर्यतीत १९९८पासून २०१८पर्यंत प्रत्येक स्पर्धेत पहिले तिन्ही क्रमांक केनियाच्या धावपटूंचे होते. या वर्षी प्रथमच हा क्रम चुकला. रौप्य भारताने मिळवले.

प्रियंकाने ४३ मिनिटे, ३८.८३ सेंकद अशी वेळ नोंदवली. ऑस्ट्रेलियाची जेमिमा मोटांग (४२:३४.३०) सुवर्णपदक, तर केनियाची एमिली वामुसी (४३:५०.८६) कांस्यपदकाची मानकरी ठरली. भारताची दुसरी स्पर्धक भावना जाट ४७ मिनिटे, १४.१३ सेकंद अशी वेळ देत आठव्या स्थानावर राहिली. चालण्याच्या शर्यतीत भारताने १२ वर्षांनी पदक मिळवले.



**पनवेल : सांगली येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर चॅम्पियनशिप बॅडमिंटन स्पर्धेत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची खेळाडू अनुष्का इप्ते हिने अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत कांस्य पदक पटकावले. त्याबद्दल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, चेअरमन माजी सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच जनरल सेक्रेटरी वाय. टी. देशमुख यांनी तिचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com